27 FEB TO 05 MARCH 2023 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 2/25/2023 7:35 PM Page 1

CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : १० सोमवार दि. २७ फेब्रुवारी २०२३ ते रविवार दि. ०५ मार्च २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

शेतीच्या वादातून भयानक हत्याकांड घडले शेजाऱ्याने दोन बहिणींसह तिघींचे मुडदे पाडले | ३

आता कुठे गेले गोरक्षक आणि हिंदुत्ववादी! संपादकीय... | ४

राज्यात वन औद्योगिक विकास महामंडळ सुरु करणार -सुधीर मुनगंटीवार | ५

जिल्ह्यात शाश्वत स्वच्छता ठेवणे हीच संत गाडगेबाबांना आदरांजली-संदिप कोहिणकर | ७

वाळूमाफीयांशी साटेलोटे शासनाची फसवणूक; पाथरी तहसीलदारांच्या चौकशीचे जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आदेश | ८

# १२५ वर्षांची मातीची कहाणी

(१८९७-२०२२)





राजस्थानातील
मारवाड-आगोळाई गावातून पाण्याच्या शोधात
दोन युवक बाहेर पडले.
ते साल होतं १८९७ सव्वाशे वर्ष झाली या गोष्टीला.
जवारमलजी आणि धाकटा छोटमलजी.

जोडी थेट पोचली अजिंठ्याच्या पायथ्याशी. मुक्काम वडाळी - वाकोद, जिल्हा जळगाव. हाती रिकामा लोटा, उरात अफाट जिद्द. रुजलेल्या कठोर परिश्रमाचा बांधा, भविष्य घडविण्याची अपरंपार उमेद.

जवारमलजींची तीन अपत्यं, सागरमलजी, मुकनचंदजी, हस्तीमलजी. सागरमलजींचे चिरंजीव हिरालालजी यांचा नित्यक्रम-

रामप्रहरी धार काढून गडी-माणसांना उठवायचं, ऊन-पाऊस-वारा यांची तमा न बाळगता चालायला लागायचं. शेती-माती करायची, धान्य-दाण्याची देवघेव करायची. पै-पैका शिलकी टाकायचा. पुनः शेतीतच लावायचा. शेती वाढवायची.

*मोठ्या एकत्र कुटुंबाला गुण्यागोविंदानं नांदवायचं.* हे सगळं करत असताना माणुसकी जपायची. प्रेम द्यायचं, सग्या-सोयऱ्यांपेक्षा शेजार, शहरापेक्षा गाव जवळचं मानायचं. धनाजी वानखेडे असो वा नामदेवराव देशमुख अर्ध्या रात्रीही परस्परांच्या हाकेला धावून जायचं! कै. हिरालालजी व गौराबाईच्या कुंडल्यात विचित्र ग्रहांची युती. ओळीनं चार अपत्यं जगली नाही म्हणून पाचवं हरिजनाच्या ओटीत टाकलं, जगलं. त्याचं नाव भवरलाल, धाकटा कांतीलाल.

आजही तळागाळातल्या माणसाबद्दल व वाकोद-जळगावबद्दल प्रेम, कृतज्ञता, त्यांनीच हे जीवन दिलं ही भावना कायम दिसून येते. त्यांचे पांग याच जन्मात फेडायसाठी सारखी तळमळ, आकांक्षा, धडपड.

वाडवडिलांनी पाण्यासाठी दाहीदिशा शोधल्या. भवरलालजींनीही तोच ध्यास घेतला.

पाणी नियोजनाचा. पिढ्यापिढ्यांना जोडणारा हाच अंतरीचा धागा !

त्याला जोड दिली नवतंत्राची, ज्ञानाची, संशोधनाची, मातीच्या बांधिलकीचं तर बाळकडूच होतं. राणीदानजी, बन्सीलालजी, दलीचंदजी, शिवराजजी, कांतीलालजी, गिरिधरलालजी यांच्या साथसोबतीने भवरलालजींनी उद्योगाची पायाभरणी केली.
निष्कलंक चारित्र्य हा वारसा पिढ्यानपिढ्या होताच. साधेपणा आणि सदाचार रक्तातच. संयुक्त कुटुंबातील सर्वांचं जगणं खुल्या पुस्तकासारखं, कुणाला कोणी शिकवलं नाही. परस्परांकडे पाहूनच ते आपसूक घडत गेले.

हा हा म्हणता रोपट्याचा कल्पवृक्ष झाला. पुढची पिढी आली.

भवरलालजींचे आणि कांताईंचे अशोक, अनिल, अजित, अतुल व कांतीलालजींचे आणि शकुंतला यांचे अभय, अविनाश वारसा सांगूनच मोठी झाली. डोक्यावरची पगडी गेली, टोपीही गेली, हातात मोबाईल व प्रसंगी गळ्यात टाय आला. बैलगाडी गेली. विमानं आली.

- शेती आधारीत व्यवसाय मात्र कायम राहिले. भूमिपुत्रांचा आर्थिक स्रोत उन्नत करणारे कृषिविषयक प्रकल्प वाढले. शेतकऱ्यांच्या भरभक्कम सहकार्याने वाढत्या उद्योगासोबत सहकाऱ्यांच्या संख्यात्मक-गुणात्मक वाढीसह कारखाने, कार्यालयेही वाढली. वाकोद ते थेट जगभर आंतरराष्ट्रीय स्तरावरचा व्याप सहकाऱ्यांच्याही परिश्रमाने आणि बांधिलकीने विस्तारला. भारत सरकारद्वारा भवरलालजी 'पद्मश्री'ने सन्मानित झाले. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्काराने वेळोवेळी विभूषितही झाले, कर्मभूमीशी असलेलं नातं मात्र कायम राहिलं. आजही. अशोकला ज्योतीची, अनिलला निशाची, अजितला शोभनाची तसेच अतुलला भावनाची आत्मीयतापूर्वक साथसोबत लाभली, संयुक्त परिवाराचा वसा आणि वारसा परंपरेने चौथी पिढीही प्रेमाने सांभाळताहेत... चौथी पिढी - अथांग-अंबिका, अमोली, अभेद्य, आशुली, आरोही, अभंगसुद्धा त्याच व्यवसायात जुडली. आत्मन आणि अन्मय याच वाटेवर येतील...

अजूनही भली पहाट सोबत्यांच्या साथीनंच उगवते.

आजही अशोकजींच्या बरोबर 'घनश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला' भूपाळीसह कोवळ्या उन्हातल्या ऋचा कानावर घेत अर्थम्, भवरलालजींचा आणि कांताईंचा पणतू पहाट आनंददायी करतो...

सव्वाशे वर्षांच्या कहाणी, परंपरेची, साठा उत्तरांची, सुफळ तर झालीच पण निरंतर प्रवाहितही आहे... जगण्याला अर्थ देणाऱ्या थेंबापासून शाश्वततेचा भावार्थ देणाऱ्या तीर्थापर्यंत...

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®
www.jains.com

## श्रद्धेय भवरलालजी जैन यांना श्रद्धावंदनदिनी कृतज्ञतापूर्वक प्रणाम...

*(जन्म : १२ डिसेंबर १९३७ निर्वाण : २५ फेब्रुवारी २०१६)*

कांताई नेत्रालय – आय केयर फॉर यू | जैन स्पोर्टस् अकॅडमी – आरोग्य. आत्मनिर्भर. अभेद्यता. | बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट | भवरलाल अँण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन – www.bkjfoundation.org | जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. – कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.® – www.jains.com | भवरलालजी आणि कांताई जैन परिवार – www.bhavarlaljain.in | जैन फार्म फ्रेश फुड्स् लि. – मस्त चवीमागचं तुमचं पाककौशल्य. – www.jainfarmfresh.com | गांधी रिसर्च फाऊंडेशन – •सत्य •अहिंसा •शांती – www.gandhifoundation.net | अनुभूति स्कूल – www.anubhutischool.in | गौराई कृषी-तंत्र निकेतन | भाईसाहेब सुंदरलाल मल्हारा पोटेन्शियल डेव्हलपमेंट अकॅडमी

CMYK

27 FEB TO 05 MARCH 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 2/25/2023 7:36 PM Page 1



## थोडक्यात वृत्तांत

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू

लातूर : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विजयकुमार ढगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१)(३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केला आहे. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत १६ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते २८ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरून) लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

### ६८ ग्रामपंचायतींच्या मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

लातूर : निधन, राजीनामा, अनहर्ता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य, थेट सरपंचांच्या रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या २० फेब्रुवारी २०२३ रोजीच्या आदेशानुसार पारंपारिक पद्धतीने राबविण्याचा मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार जिल्ह्यातील ६८ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीसाठी पारंपारिक पद्धतीने मतदार यादीचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी ५ जानेवारी २०२३ ची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादी २४ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रसिद्ध होईल. २४ फेब्रुवारी ते २ मार्च २०२३ या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. त्यानंतर प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी ९ मार्च २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गणेश महाडिक यांनी कळविले आहे.

### राष्ट्रीय युवा स्वयंसेवक पदासाठी अर्ज करा!

लातूर : देशातील युवकांना संघटीत करून राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत सहभागी करणे, त्यांच्यातील सुप्त गुण, प्रतिभाशक्ती व कौशल्य यांना वाव देणे, युवा शक्तीच्या माध्यमातून आरोग्य, संवर्धन, साक्षरता, स्वच्छता, स्त्री-पुरुष समानता व अन्य सामाजिक क्षेत्रात प्रमुख भूमिका निभावण्यासाठी तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन व आपत्कालीन परिस्थितीत गरज पडल्यास प्रशासनाला योग्य सहकार्य करण्यासाठी राष्ट्रीय युवा स्वयंसेवक निवड करण्यात येणार आहे. यासाठी पात्र इच्छुकांनी ९ मार्च २०२३ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन नेहरू युवा केंद्राच्या जिल्हा युवा अधिकारी साक्षी समैया यांनी केले आहे. राष्ट्रीय युवा स्वयंसेवक पदासाठी दहावी पास, पदवीधर, संगणकीय ज्ञान आवश्यक आहे. महिला व नेहरू युवा मंडळाशी सलंग्न उमेदवारांना प्राधान्य राहील. १ एप्रिल २०२३ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षे ते २९ वर्षे दरम्यान असावे. सद्यस्थितीत पूर्णकालीन शिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी अर्ज करता येणार नाही. या पदासाठी जास्तीत जास्त दोन वर्षांसाठी दरमहा पाच हजार रुपये मानधन देण्यात येईल. हे कार्य रोजंदारी पद्धतीची नाही किंवा स्वयंसेवकाना, सरकारी स्थायी नोकरी किंवा रोजगारासाठी दावा करण्याचा कसल्याही प्रकारचा हक्क राहणार नाही. पात्रता, अटी व अर्जाचा नमुना https://nyks.nic.in/nycapp/strmainnycapp.asp या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्जाचा नमुना उपलब्ध आहे. विहित नमुन्यातील अर्ज ९ मार्च २०२३ पूर्वी ऑनलाईन तथा जिल्हा युवा अधिकारी, नेहरू युवा केंद्र, मध्यवर्तीय प्रशाशकीय इमारत, दुसरा मजला, लातूर (दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२९५५९८, भ्रमणध्वनी क्र. ७८३८६२८६५७) या पत्त्यावर सादर करावेत, असे आवाहन नेहरू युवा केंद्रामार्फत करण्यात आले आहे.

### समाज मंदीर सुशोभीकरणसाठी चार कोटीचा निधी

औसा : औसा विधानसभा मतदार संघातील सर्व समाज मंदिराची दुरुस्ती व सुशोभीकरण करण्याची आवश्यकता आहे. या कामासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे औसा मतदारसंघातील ८० गावांमधील समाजमंदिर दुरुस्ती व सुशोभीकरण कामांसाठी राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. आमदार अभिमन्यू पवार यांनामतदारसंघातील दौऱ्यात अनेक ठिकाणी समाज मंदिराची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले. याबाबत स्थानिक नागरिकांकडूनही या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी होत असल्याने मतदारसंघातील संपूर्ण गावातील समाज मंदिराची दुरुस्ती व सुशोभीकरण करण्याच्या दृष्टीने त्यांनी राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाकडे पाठपुरावा करून यासाठी निधीची मागणी केली होती. यानुसार पहिल्या टप्प्यात औसा विधानसभा मतदारसंघातील ८० गावांमधील समाजमंदिर दुरुस्ती व सुशोभीकरण कामांसाठी ४ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून मतदार संघातील नादुरुस्त झालेल्या व वापरात नसलेल्या समाजमंदिराची दुरुस्ती व रंगरंगोटी करून, तिथे वृक्षलागवड करून तसेच तिथे लाइट, बैठक व्यवस्था, कंपाउंड वॉल व पेव्हर ब्लॉक आदी सुविधांची निर्मिती करून समाजमंदिराचा प्रार्थना स्थळ म्हणून विकास करण्यात येणार आहे. सदरील निधी मंजूर केल्याबद्दल आमदार अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री गिरीश महाजन यांचे आभार मानले आहेत.संपूर्ण मतदारसंघातील समाज मंदिर दुरुस्ती व सुशोभीकरण कामांना निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या टप्प्यात मतदारसंघातील ८० गावांमध्ये हा निधी देण्यात आला असून पुढच्या टप्प्यात उर्वरित सर्वच गावांसाठी या योजनेतून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

क्राईम Reporter
क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.
9890718873

# एमआयडीएसआरचे विद्यार्थी दंत वैज्ञानिक म्हणून देशासाठी सेवा देतील - प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे




**लातूर/प्रतिनिधी**

सैध्दांतीक आणि प्रात्यक्षिक ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांची संशोधकवृत्ती विकसीत व्हावी म्हणून वैज्ञानिक मंचची सुरुवात करण्यात आली आहे. या मंचच्या माध्यमातून दंत शिक्षण व दंतरोग उपचार या विषयीच्या ज्ञानाची देवाण-घेवाण करुन संशोधनाचे धडे दिले जात आहेत. दंत शाखेतील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शैक्षणीक अवस्थेतच संशोधनाचे धडे मिळत असल्यामुळे येणाऱ्या काळात एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे विद्यार्थी हे दंत वैज्ञानिक होऊन देशासाठी सेवा देतील, असा विश्वास एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे यांनी व्यक्त केला. येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील दंत शिक्षण विभाग आणि ओरल मेडिसिन व रेडिओलॉजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. २२ फेब्रुवारी २०२३ रोजी आयोजित दुसऱ्या वैज्ञानिक मंच कार्यक्रमात डॉ. सुरेश कांगणे बोलत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी, ओरल मेडिसिन विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी सुलतानपुरी, वैज्ञानिक मंचच्या सदस्या डॉ. शिल्पा केंद्रे, डॉ. पुनम नागरगोजे, डॉ. स्मिता चावरे, डॉ. प्रियंका लासुणे यांची प्रमुख उपस्थिती होती. गेल्या काही वर्षांत दंत वैद्यकीय क्षेत्रात तांत्रिक आणि वैज्ञानिक नवकल्पना वेगाने विकसीत होत आहेत. दंत शाखेतील बदलते आयाम लक्षात घेवून नवीन कल्पना आणि आद्यावत तंत्राज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य रुजविण्याचे काम एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात केले जात असल्याचे सांगून यावेळी पुढे बोलताना डॉ. सुरेश कांगणे म्हणाले की, बदलती जिवनशैली आणि व्यसनाधीनता यामुळे दंतरोग व मुख कर्करोगाचे प्रमाण वाढत चालले आहे. वाढत्या दंतरोग व मुख कर्करोगाला आळा घालण्यासाठी प्राथमिक आवस्थेतच आजाराचे निदान होणे गरजेचे आहे. त्यासाठी दंत रोगाची लक्षणे दिसून आल्यास तात्काळ दंतरोग तज्ञाकडून तपासणी करुन उपचार घ्यावेत असे डॉ.कांगणे यांनी सांगितले.

यावेळी दुसऱ्या वैज्ञानिक मंचचे सादरीकरण ओरल मेडिसिन व रेडिओलॉजी विभागाच्या वतीने करण्यात आले. यामध्ये डॉ. विजयालक्ष्मी सुलतानपुरी यांनी लिक्विड बायोप्सी इन ओरल कॅन्सर आधुनीक निदान व तंत्रज्ञान या विषयावर सादरीकरण करुन विस्तृत माहिती दिली. तसेच वरिष्ठ व्याख्याता डॉ. प्रियंका लासुणे यांनी मौखिक घातकतेच्या स्क्रीनिंगसाठी क्रिस्टलायझेशन चाचणी : लवकर शोधण्याचे मार्ग या विषयावर सादरीकरण केले. तर बी.डी.एस. आंतरवासिता विद्यार्थीनी मयुरी कोथळे हिने किरणोत्सर्गाच्या दिशेने ज्ञान आणि आकलनाचे मूल्यांकन या संरक्षण नियमावलीवर सादरीकरण केले.

वैज्ञानिक मंचावर सादरीकरण केलेले मार्गदर्शक डॉ. विजयालक्ष्मी सुलतानपुरी, डॉ. प्रियंका लासुणे, मयुरी कोथळे यांना प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे व उप प्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.डी.एस. तृतीय वर्षाची विद्यार्थीनी सृष्टी काटपुरे हिने करुन शेवटी आभार मानले. या कार्यक्रमासाठी एमआयएमएसआर दंत महाविद्यालयातील एम.डी.एस. पदव्युत्तर, बी.डी.एस. पदवी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी, प्राध्यापक यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दंत शिक्षण विभाग आणि ओरल मेडिसिन व रेडिओलॉजी विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.




# विलास को.ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक पदी संजय निलेगांवकर

**लातूर/प्रतिनिधी**

विलास को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड, लातूर या बँकेच्या तज्ञ-संचालक पदी संजय निलेगांवकर यांची नियुक्ती करण्यात आली. यानिमित्त बँकेचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी संजय निलेगांवकर यांचा सत्कार केला. याप्रसंगी उपाध्यक्ष ॲड.समद पटेल, संचालक सूर्यकांत कातळे, व्यंकटेश पुरी, संजय सूर्यवंशी यांच्यासह संचालक आणि सभासद उपस्थित होते. या निवडीबद्दल माजी मंत्री तथा लातूर शहराचे आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख व शहरातील मान्यवरांनी संजय निलेगांवकर यांचे अभिनंदन केले आहे.

## ६ मार्च रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याच्या पहिल्या सोमवारी करण्यात येते. त्या अनुषंगाने या महिन्यातील मार्च २०२३ चा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि. ६ मार्च २०२३ रोजी दुपारी १:०० वाजता जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येणार आहे. तरी अर्ज केलेल्या नागरिकांनी सदर बैठकीस आवश्यक त्या माहितीसह प्रत्यक्ष वरील दिनांकास व वेळेवर उपस्थित रहावे.

# समाजसेवक डॉ. मिलिंद भोई हे भोई समाजाचे ब्रँडच -अर्जुन भोई

**वाडा/प्रतिनीधी**

भोई फाउंडेशन आणि गायत्री व्हाईस केअर सेंटरच्या माध्यमातून पुण्यात जगप्रसिद्ध गायक हरीहरन यांना स्वर गायत्री पुरस्कार आणि डॉ. मिलिंद भोई लिखित पुस्तकाचे प्रकाशन सोहळा शेकडोंच्या उपस्थितीत पार पडला. त्यात राज्यातील एक भोई समाजघटक म्हणून जी जबाबदारी आमच्यावर देण्यात आली होती ती मोठ्या मनाने पार पाडून डॉ. मिलिंद भोई हे भोई समाजाचे एक ब्रँडच असल्याचे मत अर्जुन भोई यांनी व्यक्त केले. ते पुणे येथील कार्यक्रमात बोलत होते. ते पुढे म्हणाले की, डॉ. मिलिंद भोई यांच्या कार्याची प्रचिती ही त्यांनी केलेल्या कार्यातून तरी सतत आम्ही पाहात आहोत. गावात, जिल्ह्यात, राज्यात, राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांनी आपला ठसा भोई म्हणूनच उमटविला म्हणून आम्ही जेव्हाजेव्हा त्यांना भेटतो तेव्हातेव्हा त्यांच्या प्रति आदरच वाढतो. पुण्यातील कार्यक्रमात शेकडोंच्या संख्येच्या रुपात जो जनसमुदाय एका आवाजावर एकत्र आला होता ही त्यांच्या कार्याची पोहोच पावतीच होती. सदरच्या कार्यक्रमाला आलेला जनसमुदाय हा त्यांच्या सेवाभावी कार्यातून तरी



एकत्र आला होता त्यात कोणतीही देणगी घेऊन आला नव्हताच. सामाजिक, सहकार, राजकीय, शैक्षणिक, वैज्ञानिक, संगीत, गायन, वादन, खेळ, वैद्यकीय या संपुर्ण क्षेत्रातील जनसमुदाय हा सहभागी झालेला होता. जेष्ठ संगीतकार प्यारेलाल, डॉ. विनय सहस्रबुद्धे, पद्मश्री पं. सुरेश तळवळकर, पं. विकासजी कशाळकर, पं. प्रमोद मराठे, पं. सुहास, विद्वान गायक डॉ भरत बलवल्ली, डॉ अच्युत गोडबोले, रुपाली चाकणकर, किती तरी खड, खझड, व चौंलितून पुढे आलेली मंडळी यावेळी हजर होती तसेच इकबाल दरबार यांच्या प्रस्तुत ऑर्केस्ट्राने कार्यक्रमात विशेष आनंद निर्मिती केली गेली. यावेळी चांद्यापासून बांद्यापर्यतचा, कोल्हापूर पासून ते नंदूरबार पर्यतचा भोईसमाज घटक हा आपल्या परिसर उपस्थितीच्या रुपात हजर होता. अनिल घुमे, अर्जुन भोई, सारिका आग्रेन, चंद्रकांत लोणारे, संतोषराव मोरे, रविंद्र मोरे, मानव भोई, नलिनीताई कारळे, डॉ युवराज लांबोळे, शोभाताई भोकरे, गोविंद घाग, राणोजी ठोंबरे, अजित वंजारे, दिलीपराव सिद्धे, शिवाजीराव दौडे, डॉ स्नेहलकणीचे (डेप्युटी कलेक्टर यवतमाळ) सतीश ढगे, सुनंदा ढगे, बाबासाहेब घोलप, मीनाक्षी कांबळे, प्रकाश रामोळे, नामदेव घुमे, महेंद्र तिकोणे, सतीश ढगे, कल्पना कारळे, युवराज कारळे, छाया कांबळे, वैशाली भोई, स्वाती तारू, राजश्री घुमे, कांचन सिद्धे, सुनील घाग, रवींद्र आयरे, सुनील पेटकर, चंद्रकांत कारळे, बळीराम जाधव, रजत चक्के, गणेश बावने, सुरेश चव्हाण, गोरखनाथ जाधव, बापूराव तारू, रवींद्र कांबळे, डॉ. हरिभाऊ म्हात्रे, जनार्धन तारू, आशा भोई, बळीराम जाधव, उत्तम भोई, शंकरराव कांबळे, मनोज जावरे, प्रकाश रामोळे.... इत्यादी इत्यादी अशी अनेक मंडळी भोईसमाज घटक म्हणून तरी उपस्थित होती. मा डॉ मिलिंद भोई यांच्याबरोबर सहभागी होतांना त्यांचे नेहमी शब्द असतात एहसान मेरे दिल पे तुम्हारा है दोस्तो, ये दिल तुम्हारे प्यार का मारा है दोस्तो.... खरच दोस्तांच्या दुनियेतील एक उत्तुंग शिखर म्हणून आम्ही डॉ. मिलिंद भोई यांच्याकडे पाहतो त्यांच्या सेवारुपी कार्यातून ते आमचे एक भोईब्रँन्डच आहे हेही समजतो.

## विद्यालयात संत गाडगे महाराज जयंती

**लातूर/प्रतिनिधी**

येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात संत गाडगे महाराज जयंती उत्साहात आणि परिसर स्वच्छता या उपक्रमाने साजरी करण्यात आली. या प्रसंगी पर्यवेक्षक संदीप देशमुख, बबन गायकवाड, बलोपासक मंडळ प्रमुख प्रयागराज गरुड यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. याप्रसंगी वर्ग मंत्रिमंडळातील स्वच्छता प्रमुखांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. प्रत्येक वर्गाच्या मंत्रिमंडळातील स्वच्छता मंत्री हा महात्मा गांधी आणि संत गाडगेबाबा यांच्या विचारांचा व कार्याचा वारसदार आहे.वर्षभर त्यांनी आपला वर्ग आणि शाळेचा परिसर स्वच्छ राहण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे,असे मत बबन गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केले.सर्व स्वच्छता मंत्री असलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.यानिमित्त सर्व स्वच्छता मंत्री विद्यार्थ्यांनी शाळेचापरिसर स्वच्छ करून स्वच्छतेचा संदेश दिला. बलोपासक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन निर्मला मुंडे हिने केले. संत गाडगेबाबा यांच्या जीवन कार्याची माहिती पुनम राऊत हिने सांगितली. अथर्व लड्डा याने आभार मानले.

## पोलिसाकडून मयत इसमाच्या नातेवाईकांचा शोध!

**वसई/प्रतिनिधी**



माणिकपूर पोलीस ठाणे मृत्यू रजिस्टर नंबर १०/२०२३ मधील पूर्ण नाव पत्ता माहीत नाही हा दिनांक १७/०२/२०२६ रोजी माणिकपूर पोलीस ठाणे जिल्हा पालघर हद्दीतील जुन्या आयसीआयसीआय बँकेच्या इमारती जवळ दीनदयाल नगर वसई पश्चिम काहीसा उताणे स्थितीत निपचित पडलेला व काही हालचाल करीत नसलेल्या अवस्थेत दिसून आला, म्हणून पोलिसांनी जवळ असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र नवघर पश्चिम येथे दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून त्यास मयत झाल्याचे घोषित केले. मिळून आलेल्या मयत व्यक्तीचे वय साधारण पन्नास वर्षे आहे. त्यांच्या वारसांचा पोलीस ठाण्यात आजूबाजू परिसरात तपास करीत अद्याप त्याचे नातेवाईक मिळून आलेले नाही. याबद्दल कोणास काही माहीत असेल तर माणिकपूर पोलीस ठाण्यात संपर्क साधावा.

# कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी**




कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष कृष्णा इंगळे यांनी शासनाकडे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी वारंवार मागणी करूनही ते सोडवीले जात नाहीत. यासाठी राज्यातील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पदोन्नती देण्यात यावी व २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी यासह व इतर मागण्यांसाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे राज्य अध्यक्ष कृष्णा इंगळे, कार्याध्यक्ष गणेश मडावी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुमित भूईगळ यांच्या आदेशानूसार 'लोकशाही की पेशवाई' या सदराखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे, आंदोलन करण्यात येऊन याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी, लातूर यांना कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने देण्यात आले. यावेळी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, लातूरचे जिल्हा अध्यक्ष नितीन बनसोडे, सचिव गणेश राठोड, कोषाध्यक्ष प्रशांत म्हेत्रे, जिल्हा संघटक अशोक माळगे, ज्येष्ठ कार्यकर्ते नागरत्न कांबळे यांच्यासह जिल्हा कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे सुभाष मस्के, राहूल गायकवाड, राजकुमार गुंजरगे, संजय राऊत, कास्ट्राईब महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय सूर्यवंशी,गुरुदत्त सूर्यवंशी, शरद पुणे, गणेश वेडीगुटी, सतीश इबितवार जिल्हा परिषद कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे सुधीर बोकेफोडे, सदाशिव नवले, ओंकार वंजारे, कविता तांबारे, वन विभाग कर्मचारी संघटनेचे गोविंद घुले, विनोद पाटील, आयटीआयचे प्रसाद पवार, शिला उघाडे व वनमाला उघाडे यांची उपस्थिती होती.

या धरणे आंदोलनास राज्य सरकारी कर्मचारी मध्यवती संघटनेचे निमंत्रक संजय कलशेट्टी, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना लातूर जिल्हा राज्य सहसचिव अरविंद पुलगुर्ले, जिल्हाध्यक्ष तानाजी सोमवंशी, तलाठी संघटनेचे महेश हिप्परगे, ग्रामसेवक संघटनेचे अनंत सूर्यवंशी यांनी पूर्ण वेळ उपस्थित राहून जाहिर पाठिंबा दिला. यावेळी सुभाष मस्के, अशोक माळगे, राहुल गायकवाड, ओंकार वंजारे, पी.एस.नरसिंगे, विशाल जोगदंड, दत्तात्रय सूर्यवंशी यांची आंदोलनामागील रुपरेषा सांगून धरणे आंदोलन किती महत्त्वाचे आहे. याबाबतचे मार्गदर्शनपर भाषणे झाली. कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, कास्ट्राईब महसूल कर्मचारी संघटना, जिल्हा परिषद कर्मचारी संघटना, कास्ट्राईब वनविभाग कर्मचारी संघटना, कास्ट्राईब तलाठी कर्मचारी संघटना, कास्ट्राईब शिक्षक संघटना, कास्ट्राईब आयटीआय संघटना, जलसंपदा संघटना, माहिती व जनसंपर्क कर्मचारी संघटना यासह तालुकास्तरीय संघटनांनी सहभाग घेऊन धरणे व आंदोलन यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## बोळेगाव-आळवाई रोडवर देशी-विदेशी दारू जप्त

देवणी : बोळेगाव-आळवाई रोडवर देशी-विदेशी दारु व ओमीणी वाहन असे एकुण १ लाख ६६ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून देवणी पोलीस ठाण्यात एकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोळेगाव ते आळवाई जाणाऱ्या रोडवर बोळेगाव येथे यातील नमुद आरोपीने याने स्वतःचे ओमीनी गाडीमध्ये पाच खपटी बॉक्स मध्ये देशी दारू सुपर संत्रा सुपरीम असे कागदी लेबल असलेल्या १८० एम एल च्या काचेच्या सिलबंद २१५ बाटल्या प्रती बॉटल ७० रु प्रमाणे अंदाजे किम्मत १५ हजार ५० रुपये व विदेशी मॅकडॉल नंबर वन असे कागदी लेबल असलेल्या १८० एम एल च्या काचेच्या सिल बंद ११ बाटल्या प्रती बॉटल १६० रुपये दरा प्रमाणे एकुण अंदाजे किम्मत १ हजार ७६० रुपये. ओमीणी किम्मत १ लाख ५० हजार रुपये असे एकुण १ लाख ६६ हजार ८१० रुपयांचा माल चोरटी विक्री व्यवसाय करण्याच्या उददेशाने विनापास परवाना बेकायदेशीर रित्या विक्री करण्याचे उददेशाने घेवुन जात असताना मिळून आला.

27 FEB TO 05 MARCH 2023 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 2/25/2023 7:37 PM Page 1



# शेतीच्या वादातून भयानक हत्याकांड घडले शेजाऱ्याने दोन बहिणींसह तिघींचे मुडदे पाडले

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

ग्रामीण भागात शेती हेच उपजीविकेचे मोठे साधन असते. त्यामुळे शेतकरी आपली एक इंचही जमीन दुसऱ्याच्या ताब्यात जायला देत नाही. शेतीवरून जे वाद होतात त्या वादातून माणूस कधी कधी रक्ताच्या नात्यातील माणसाचीही परवा करीत नाही. कधी कधी तर शेतीचे हे वाद पिढ्यानपिढ्या सुरु राहतात. ग्रामीण भागात सरकारने तंटामुक्ती समित्या तयार केलेल्या आहेत. त्यांच्या मार्फत शेतीचे वाद मिटवण्याचा प्रयत्न केला जातो, पण त्यातही जेंव्हा असे वाद मिटवण्यात अपयश येतात तेंव्हा मात्र हे वाद कुणाचे तरी बळी घेऊनच संपतात शेतीच्या अशाच वादातून भावाने भावाची, मुलाने आई-वडिलांची, भावाने बहिणीची हत्या केल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे शेतीचे वाद वेळच्या वेळी मिटणे गरजेचे आहे, पण जर का हे वाद असेच दुसमत राहिले तर केंव्हातरी या वादाचा असा काही भयानक स्फोट होतो कि या स्फोटातून मोठमोठी हत्याकांडे घडू शकतात. सोलापूर जिल्ह्याच्या नंदेश्वर येथे अशाच शेतीच्या वादातून एका माथेफिरूने ३ महिलांची अत्यंत निर्घुणपणे दगडाने ठेचून हत्या केली. या घटनेने संपूर्ण सोलापूर जिल्हा हादरला असून मंगळवेढा पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. सुदैवाने या घटनेत एका मयत मुलीची छोटी मुलगी मात्र बचावली. कारण ती घरात आहे याची आरोपीला कल्पना नव्हती अन्यथा त्याने तिलाही ठार मारले असते. त्यामुळे या माथेफिरू मारेकऱ्याला तत्काळ फासावर लटकवा अशी मागणी गावकरी करीत आहेत.





आरोपी समाधान लोहार

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार मंगळवेडा तालुक्यातील नंदेश्वर पासून १ किमी अंतरावर महादेव माळी यांचे त्यांच्या शेतातच घर आहे. माळी यांचे गावात छोटेसे हॉटेल आहे, हे हॉटेल ते आपल्या मुलांच्या मदतीने चालवतात. दरम्यान माळी यांच्या दोन बहिणी पारूबाई बाबासो माळी (५०) आणि संगीता महादेव माळी (४७) या माहेरी आल्या होत्या आणि शेतातील घरातच राहत होत्या. दरम्यान त्यांच्या शेजारीच समाधान लोहार यांचे शेत आहे. माळी आणि लोहार कुटुंबात शेतीच्या बांधावरून वाद आहे आणि याच वादातून दोन्ही कुटुंबांमध्ये भाडणे होत असत. माळींच्या दोन्ही बहिणी पारूबाई व संगीता यांनीही माहेरी आल्यावर शेलार कुटुंबाशी भांडण केले होते. दरम्यान २१ फेब्रुवारी रोजी महादेव माळी हे हॉटेलवर गेले होते, तर त्यांच्या धाकटा मुलगा कपड्याच्या दुकानात गेला होता. मोठा मुलगा बाळू हा त्याच्या आईला डॉक्टरकडे घेऊन गेला होता. त्यामुळे घरात बाळूची पत्नी संगीता तिची लहान मुलगी आणि बाळूच्या माहेरी आलेल्या आत्या पारूबाई आणि संगीता या तिघी होत्या. दरम्यान दत्तात्रयचा भाऊ बाळू याने अचानक त्याला फोन करून ताबडतोब वडिलांना घेऊन घरी ये, कारण इथे दोन्ही आत्या आणि तुझ्या वाहिनीचा खून झालाय असे सांगितले. हि माहिती मिळताच दत्तात्रयच्या पायाखालची जमीन सरकली, तो तत्काळ वडिलांना घेऊन घरी आला. तेंव्हा घराच्या दक्षिणेस पारुबाईचा, मागच्या बाजूस संगीताचा तर पाण्याच्या हौदाजवळ बाळूची पत्नी दीपालीचा मृतदेह पडलेला होता, तर बाळू आणि आई त्याची आई मोठमोठ्याने रडत होत्या. या भयंकर घटनेची माहिती तत्काळ ...पान ६ वर

# शुल्लक वाद विकोपाला गेला मित्राच्या हातून रिक्षावाला मेला





उल्हासनगर/किरण तेलगोटे

**दोस्ती यारीमध्ये कधीकधी शुल्लक कारणावरून वाद होतात. मात्र हे वाद लवकर मिटले नाहीत तर त्यातून दुष्मनी सुरु होते. पुढे हि दुष्मनी इतकी वाढत जाते कि त्यातून कधीकाळी मित्र असलेले एकमेकांच्या जीवावर उठतात. उल्हासनगर येथील अशाच एका घटनेत रिक्षाचालक अशोक वाघमारे आणि पप्पू जाधव हे दोघे मित्र होते. पण रिक्षावरून त्यांच्यात वाद झाला होता. या वादानंतर पप्पूने दोन दिवसांपूर्वी अशोक आणि त्याच्या कुटुंबाला ठार मारण्याची धमकी दिली होती आणि ती खरी करून दाखवली त्याने आपल्या मित्रांच्या मदतीने अशोकची हत्या केली. मात्र पोलिसांनी अवघ्या १२ तासात आरोपींना अटक केली.**





शिवीगाळ करणाऱ्या ३५ वर्षीय व्यक्तीची ओळखीच्या दोन मित्रांनी मिळून धारधार शस्त्र आणि डोक्यात दगड घालून हत्या केल्याची खळबळजनक घटना उल्हासनगर शहरातील बालकंजी बारी शाळेजवळ घडली आहे. मयत अशोक हा आरोपींचे जुने मित्र आहेत. मयत व्यक्ती अशोक हा रिक्षा रिक्षाचालक होता दोन घटनेच्या दोन दिवसांपूर्वी रिक्षाच्या कारणावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. या वादातुन मी तुला व तुझ्या कुटुंबाला जीवे ठार मारणार अशी धमकी आरोपीने अशोकला दिली. तेव्हा दुसऱ्या दिवशी आरोपी हा अशोक उभा असलेल्या ठिकाणी गेला दोघात परत वाद झाला आणि वादातुन रागाच्या भरात मित्राच्या मदतीने अशोकची हत्या केली.याप्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करून स्थानिक पोलीस व उल्हासनगर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी समांतर तपास करून दोन्ही आरोपीना १२ तासातच बेड्या ठोकल्या आहेत. पप्पू जालींदंर जाधव (वय ३६ रा. बालकंची बारी, खेमानीरोड, उल्हासनगर) अमित रमेश पांडे (वय ३० रा. महालक्ष्मी प्लॉस्टजेट कंपनी, एम.आय.डी.सी. रोड, अंबरनाथ) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. तर अशोक शामराव वाघमारे (वय ३५) असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रात्री ९.३०च्या सुमारास उल्हासनगर कॅम्प नंबर तीन ...पान ६ वर

# मोबाईलवरून त्यांच्यात वाद झाला दोन सालदारांनी तिसऱ्याचा खून केला

नाशिक/क्राईम रिपोर्टर

**मोबाईल हि सध्या प्रत्येक माणसासाठी जीवनावश्यक वस्तू झाली आहे. त्यामुळे बड्या उद्योगपती पासून सध्या कचरा गोळा करून पोट भरणाऱ्या माणसाकडेही मोबाईल असतो. मोबाईलच्या हट्टापाई काही शाळकरी मुलांनी आत्महत्या केल्याच्या घटनाही घडलेल्या आहेत. अशा या मोबाईल वरून सायखेडा येथे एका सधन शेतकऱ्याकडे राहणाऱ्या सालदारांमध्ये मोबाईलवरून वाद झाला होता. या वादात नाशिक वरून पोरं आणून मारण्याची धमकी एकाने दिली होती. त्यामुळे चिडलेल्या २ साल गड्यांनी धमकी देणाऱ्याची निर्घुणपणे हत्या केली आणि त्याचा शिरच्छेद करून मृतदेह नदीत फेकून दिला. मात्र मृताच्या हातातील रबर बॅन्ड वरून मृताची ओळख पटवून या गुन्ह्याचा छडा लावला आणि आरोपींना अटक केली.**



केवळ हातातील रबरी बँडच्या आधारे शिर नसलेल्या मयत तरुणाच्या खूनाचा गुन्हा उघडकीस आणण्याकामी नाशिक ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. सायखेडा पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक ११ फेब्रुवारी २०२३च्या सायंकाळी गंगानगर देवी मंदीरानजीक गोदावरी नदी पात्रात शिर नसलेल्या अनोळखी युवकाचा मृतदेह आढळून आला होता. ओळख पटू नये म्हणून अज्ञात मारेकऱ्यांनी त्या अनोळखी शिर विरहीत मयत तरुणाला गोणपाटात टाकून ते तारेने बांधून गोदावरी नदीपात्रात टाकले होते. या घटनेप्रकरणी सायखेडा पोलीस स्टेशनला भाग ५ गु.र.न. ३५/२३ भादवि कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेत नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी (नाशिक ग्रामीण) अर्जुन भोसले, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील तसेच सायखेडा पोलीस स्टेशनचे सपोनि पप्पू कादरी आदींनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली होती. मयत तरुणाच्या हातावर गोंदलेले माँ आणि हितेश ही दोन्ही नावे तसेच अंगावरील कपडे, हातातील पिवळ्या रंगाचे रबर बॅन्ड यावरुन मयताची ओळख पटवण्याचे काम सुरु करण्यात आले. नाशिक ग्रामीण व आयुक्तालय हद्दीतील पोलीस स्टेशन, नजीकचे जिल्हे व राज्यांमध्ये तपासयाद्या व प्रसिध्दीपत्रके प्रसारीत करण्यात आली. मयताच्या हातात मिळून आलेल्या पिवळ्या रंगाच्या रबरी बॅन्डबाबत स्थानिक बाजारात ...पान ६ वर

# जमीन हडपण्याचा डाव अंगाशी आला सुपारी देऊन सावकाराचाच गेम केला



गोकाक/क्राईम रिपोर्टर

**माणूस किती जरी श्रीमंत असला तरी त्याला धन संपत्तीचा मोह असतो. गोकाक येथील एका सावकाराने त्याच्याकडे गहाण ठेवलेली डॉक्टरची जमीन हडपण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा हा प्लान डॉक्टरच्या लक्षात येताच त्याने सुपारी देऊन सावकाराचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.**





राजेश सत्यनारायण झंवर हे गोकाकमधील मोठे व्यापारी असल्याने त्याचे व्यापाऱ्याच्या निमित्याने महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, मुंबई येथे येणे जाणे होते.गोकाक येथे ते पत्नी मुलासह आणि भावासह राहयला आहेत. झंवर हे व्यावसायिक असल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती ही सधन होती.आपल्या परिचित लोकांना ते कमी व्याज दराने मोठी रक्कम ही देत होते. ही रक्कम देत असताना ते सिक्युरिटी म्हणून पैसे घेणाऱ्याकडून त्याची जमीन किंवा इतर कागादपत्रे घेत होते. डॉ.सचिन शिरगावी हे व्यवसायने डॉक्टर असल्याने त्यांना आपला स्वत:चा मोठा दवाखाना उभा करायचा होता. त्यासाठी ते पैशाच्या जुळवा जुळवीत लागले होते. त्यांना त्यासाठी ५० लाख रूपयांची आवश्कता होती. यासाठी त्यांनी बँकेकडून ही प्रयत्न केले होते.परंतु काही कारणास्तव बँकेने त्यांना कर्ज मंजुर केले नव्हते.तरी ही त्यांनी आपली जिद्द आणि चिकाटी सोडली नव्हती. डॉ.शिवांनद पाटील हे त्याचे जवळचे मित्र होते बँकेने कर्ज नामंजुर केल्यानंतर डॉ.शिवानंद पाटील यांनी डॉ.सचिन शिरगावी यांना दवाखाना उभा करण्यासाठी लागणाऱ्या पैशासाठी गोकाक शहरातील मोठे व्यावसायीक राजेश झंवर यांचे नाव सुचविले. शिवानंद पाटील याचे झंवर हे मित्रच असल्याने झंवर हे सचिन शिरगावी यांना पैशाची मदत करतील याची खात्री होती. त्यासाठी डॉ.शिवानंद पाटील यांनी डॉ.शिरगावी याच्यावतीने पैशासाठी बोलणी केली. त्यावेळी झंवर ...पान ६ वर

# दारूसाठी त्याला पैशाची गरज होती फार शंभर रुपयांसाठी मच्छिवालीला केले ठार






रत्नागिरी (संगमेश्वर)/क्राईम रिपोर्टर

**दारूचे व्यसन लागलेला माणूस दारू मिळाली नाही, तर वेडापिसा होतो. अशावेळी दारूसाठी तो कोणत्याही थराला जाता. पिरदंवणे गावातील जयेश गमरे याचीही अशीच अवस्था झाली होती. तो दारूसाठी कुणाकडेही पैसे मागायचाय रत्नागिरीवरून एक मच्छिवाली महिला गावात मासे विकायला येत असे. तिच्याकडेही एक दोन वेळा त्याने पैसे मागितले. तिने दिले पण परत द्याचे तो नाव घेत नव्हता आणि एकदा त्याने तिला रस्त्यात अडवून पैसे मागितले. तिने नकार देताच त्याने तिच्या डोक्यात दगड घालून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

रत्नागिरी हुनामान नगरमधील मधली वाडी येथे सईदा रिझवान सय्यद ही महिला पती, मुलासह राहयला आहे. घरची परिस्थीती ही नाजुक असल्याने ती आजुबाजुच्या वाडी वस्तीवर जावून हिंडून फिरून मच्छी विकत होती. तिचा नवरा रिझवान हा रिक्षा चालवित होता. दोघांच्या कष्टातून संसार फुलत होता. सईदा ही दिसायला साधी भोळी असली तरी मच्छी विकण्यात तिचा हातखंड होता. ती रोज सकाळी लवकर उठून मार्केटमधून मच्छी घेऊन डिंगणी आणि आजबाजुच्या वाडी वस्तीवर जाऊन मच्छी विकत असे. यासाठी ती काही किमीचा रस्ता जंगलात जात तुडवत होती. तिचे ते रोजचेच काम...पान ६ वर

# महिलेची हत्या करणारा दिसला अखेर दागिने विकताना फसला

नाशिक/क्राईम रिपोर्टर



**आजकाल एकट्या दुकट्या महिलेने बाहेर पडण्यासारखी परिस्थिती महाराष्ट्रात राहिलेली नाही. शहरी भागात एकवेळ ठीक आहे, तिथे सतत माणसांची वर्दळ असते. त्यामुळे फारशी भीती नसते. पण ग्रामीण भागात रस्त्यावर किंवा शेतात एकट्या बाईने जायची सोय नाही खास करून अंगावर दागिने घालून बाहेर पडणे अधिक धोकादायक असते. नाशिक जिल्ह्यातील दहीडी गावात सुमनबाई बिचकुले ही महिला शेतात एकटीच काम करीत असल्याचे पाहून एक लुटारूने तिच्यावर झडप घातली आणि प्रथम तिचा शिरच्छेद केला, त्यानंतर तिच्या अंगावरचे दागिने ओरबाडून फरारी झाला. मात्र हे दागिने एका सराफाला विकण्याच्या प्रयत्नात तो सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेजमध्ये सापडला आणि त्यावरून पोलिसांनी त्याला अटक केली.**

सुमनबाई भास्कर बिचकुले (वय २८) ही महिला दहिदी गावाच्या शिवारातील पाणताची शेवडी परिसरातील शेतात पती व मुलांसह रहात होती. शेतीचा व्यवसाय करून बिचकुले कुटुंब आपला उदरनिर्वाह करतात. दि. ३० जानेवारी रोजी सुमनबाईचा पती भास्कर बिचकुले हा मका विकण्यासाठी मालेगावी गेला होता. जातांना त्याने सुमनबाईला कांदा पिकाला पाणी भरण्याचे सांगितले होते. त्याप्रमाणे सुमनबाई कांदा पिकाला पाणी भरू लागली. दुपारची वेळ होती. कांदा पिकाला पाणी ...पान ६ वर

# भांडणामुळे बेरोजगार प्रियकराचे डोके फिरले लिव्ह इन...मधल्या प्रेयसीला त्याने ठार मारले

नालासोपारा/एस.कुमार



**आज समाजामध्ये अनेक जोडपी लग्न न करता लिव्ह-इन रिलेंशिप मध्ये राहत आहेत. एक स्त्री व एक पुरुष यांनी विवाह न करता एकत्र राहणे याला लिव्ह-इन-रिलेशनशिप म्हटले जात असले तरी समाजामध्ये अशा संबंधांबद्दल अनेक गैरसमज व संभ्रम आहेत. विशेषतः तरुण पिढी मध्ये ते जास्त आहेत. भारतीय समाजव्यवस्थेत विवाह हा सर्वांच्या संमतीन, रीतिरिवाज प्रमाणे होत असल्याने या विवाहाला सामाजिक आणि कायदेशीर संरक्षण सुद्धा आहे. विवाह हा सामाजिक करार असल्याने तो संपुष्टात आणता येतो आणि सहमतीने वेगळे होण्याची सुविधा यात आहेच. मात्र लिव्ह-इन रिलेंशिप मध्ये तसे नाही. ही तात्पुरती व्यवस्था असून ती केव्हा ढासळेल याची खात्री नाही. अपवादात्मक परिस्थितीत म्हणजे न्यायालयीन वाद, अनावश्यक रितिभाती, उतारवयातील एकटेपणा टाळण्यासाठी सहजीवनाची आस अशा वेळी लिव्ह-इन हा उत्तम पर्याय ठरू शकतो. मात्र यातून होणार वाद अनेक तरुणीची आयुष्य उध्वस्त करून गेली आहे. दिल्ली आणि मुंबई सारख्या शहरात अशाच प्रकारच्या धक्कादायक घटना घडल्याने लिव्ह-इन बाबत उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.**

पालघर जिह्यातील आफताब पुनावाला याने त्याची लिव्ह इन पार्टनर श्रध्दा वालकर हिची हत्या करून तिचे ३५ तुकडे केल्याचा आरोप होत आहे तर दिल्लीत एका व्यक्तीने कथितपणे त्याची लिव्ह-इन पार्टनर निक्की यादवची हत्या करून तिचा मृतदेह ढाब्यावरील फ्रीजरमध्ये ठेवून त्याच दिवशी दुसऱ्या मुलीशी लग्न केल्याचे उघड झाले आहे. अशी एक घटना पुन्हा एकदा पालघर जिल्ह्यातील नालासोपारा शहरात घडली आहे. नालासोपारा येथील विजयनगर परिसरात 'सीता सदन' या इमारतीमधून १४ फेब्रुवारी रोजी दुर्गंधी येत असल्याने अनेकांची पावले या इमारतीकडे वळली. कुजल्याचा वास येत असल्याने काहीतरी चुकीचे घडत असल्याचं शेजाऱ्यांना वाटलं. त्यामुळे त्यांनी लगेच या घटनेची माहिती तुळींज पोलीस स्टेशनला कळवली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नागरकर हे आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल ...पान ६ वर

# आता कुठे गेले गोरक्षक आणि हिंदुत्ववादी!

स्व गोमातेला हिंदू संस्कृतीत साक्षात गोमाता मानतात तिची पूजा करतात. शेतकऱ्यासाठी गोमाता हे मोठे पशुधन आहे. कारण तिच्या शेणापासून ते दुधापर्यंत सर्वच गोष्टी उपयुक्त असतात. म्हणूनच सरकारने गोवंश हत्येचा कायदा बनवला. सरकारचा हा कायदा अस्तित्वात असताना काही स्वयंघोषित गोरक्षक अल्पसंख्याक समाजातील लोकांवर गोहत्येचा ठपका ठेऊन त्यांना रस्त्यात दिसतील तिथे मारहाण करतात. गो तस्करीचे गुन्हे दाखल करायला भाग पाडतात. त्यांच्या या कृतीबद्दल खुद्द पंतप्रधान मोदी यांनीही एकदा आपल्या भाषणात जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती. हे सर्व एवढ्यासाठी सांगायचं आहे की कोल्हापूरच्या कणेरी मठात पंच महाभूत महोत्सवात ५२ गायींचा मृत्यू झाला आहे. या सर्व गायी शिळे अन्न खाऊन मृत्युमुखी पडल्या असे सांगितले जात आहे. ही घटना फार गंभीर आहे. अशावेळी स्वतःला गोरक्षक समजणारे आणि गो तस्करी करीत असल्याच्या नावाखाली कोणालाही रस्त्यात गाठून मारहाण करणारे गोरक्षक ५२ गायींचा मृत्यू नंतर गप्प कसे? आता का नाही त्यांनी पंच महाभुत महोत्सवाच्या आयोजकांना जबाबदार धरून त्यांच्या विरूद्ध आवाज उठवला? आज तक सारखे गोदी मीडियाचे लोक आता का नाही ही बातमी दाखवीत किंवा या बातमीवर डिबेट घडवून आणीत? एरव्ही मोदींच्या विरोधात जरा जरी कुणी काही बोलले तर दिवसभर त्या विरूद्ध बातम्या देणारे हे चाटू गिरी करणारे चॅनलवाले आता गप्प का? कारण केंद्रात आणि राज्यात मोदींच्या भाजपचे हिंदुत्ववादी सरकार आहे म्हणून त्यांची तोंडे शिवली आहेत. जर यावेळी केंद्रात आणि राज्यात काँग्रेस पक्षाचे सरकार असते, तर स्वतःला कट्टर हिंदुत्ववादी समजणाऱ्या या लोकांनी रस्त्यावर उतरून थयथयाट केला असता. मुंबईचे शेटजी आणि पुणे नागपुरातल्या भटजींनी आभाळ कोसळले हो.. अशी बोंब मारत रस्त्यावर उतरून हैदोस घातला असता. पण ५२ गोमातांची हत्या करण्यात आली याबद्दल कोणालाही खंत नाही. सगळे चिडीचूप! हेच का यांचे हिंदुत्व? कणेरी मठात गोशाळा आहे आणि तिथे हजारो गोमाता आहेत. पण शिळे अन्न खाऊन ५२ गायीच्या मृत्यूनंतर इथल्या सर्वच गाईंच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सरकार मधले हिंदुत्ववादी गप्प का? संघातील लाठी काठी वाल्या तथाकथित हिंदुत्व वाद्यांच्या हृदयाला या घटनेने पुसटशी सुध्दा वेदना झाली नाही का? ज्यांच्या हृदयात देव आणि गोमाता आहे तो प्रत्येक हिंदू ५२ गाईंच्या हत्येने हळहळतो आहे आणि जे हिंदुत्वाची पाटी गळ्यात घालून राजकारणाच्या चोर बाजारात मतांचा जोगवा मागत फिरत आहेत ते मात्र शांत आहेत. कारण या गाईंच्या मृत्यूला जबाबदार असणारे हिंदुत्ववादी आहेत. त्याच्या विश्वास अहर्तेचा समाजात पंचनामा होऊ नये आणि त्यांचे खरे रूप जगाला दिसू नये म्हणून या भयंकर घटनेवर पडदा टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. हिंदुत्वाचा वापर आपल्या सोईनुसार कसा केला जातो याचेच हे जिवंत आणि तितकेच संतापजनक उदाहरण आहे. मग अशा लोकांवर या देशातील तमाम हिंदूंनी विश्वास ठेवावा का? खरे तर या घटने नंतर पंच महभूत महोत्सवाला बंदी घालून या महोत्सवाच्या आयोजकांची कसून चौकशी करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करायला हवा. त्याच बरोबर देशातील सर्व गोशाळाची तपासणी करून तिथल्या गाईंची सध्या काय अवस्था आहे याची सरकारने माहिती घ्यायला हवी. कारण ज्यांनी गोमातांच्या संगोपनाची आणि सुरक्षेची जबाबदारी घेतलेली आहे ते गोशाळा चालवणारे ही जबाबदारी प्रामाणिकपणे पाळतात की नाही याची शहानिशा व्हायलाच हवी आणि केंद्र सरकार तसेच प्रत्येक राज्यातील सरकारची जबाबदारी आहे. त्याचबरोबर स्वयंघोषित गोरक्षक यांनीही या गोशाळामध्ये जाऊन तिथल्या परिस्थितीचा आढावा घ्यायला हवा. रस्त्यावर फिरून केवळ अल्पसंख्यांकांना टार्गेट करण्यापेक्षा गोशाळा मधील वास्तव जाणून घेणे अधिक महत्वाचे आहे, राहता राहिला प्रश्न जनवरांच्या तस्करीचा! तर अशा लोकांवर कठोर कारवाई व्हायलाच हवी. तसेच गोवंश हत्या बंदी कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी व्हायला हवी आणि हे काम अर्थातच सरकारने करायला हवे भलत्या सलत्या लोकांनी कायदा हातात घेऊन एका विशिष्ट समाजातील लोकांना टार्गेट करणे चुकीचे आहे. मुळात वन्य जीव रक्षणाबाबत केवळ कागदावर कायदे आहेत, पण त्याची अंमलबजावणी केली जात नाही. त्यामुळे या देशात मुक्या प्राण्यांचे हाल केले जातात. बैलगाडा किंवा जली कट्टू सारख्या स्पर्धा या त्याचाच भाग आहे. पण त्याबाबत दिशाभूल केली जाते. पशुधन हे शेतकऱ्यांसाठी पोटच्या पोरासारखे असते त्यामुळे गाय, म्हैस, बैल यांचे हाल होताना शेतकरी पाहू शकत नाही, पण काही पुढाऱ्यांनी शेतकऱ्याच्या मनात संस्कृती आणि रूढी परंपरांची खोडसाळ कल्पना रुजवली, त्यामुळे बैलगाडा सारख्या शर्यतींना शेतकरी तयार होतो. पण हे कुठेतरी थांबायला हवे, जर थांबले नाही तर यातून आणखी मोठे वाद निर्माण होऊ शकतात.

## शेतकरी मंत्रालय स्थापन व्हावे म्हणून विठ्ठलाला साकडे

# ग्रंथ दिंडी जनजागर यात्रेचा पंढरपुरात समारोप



शेतकरी वारकरी कष्टकरी महासंघाची ग्रंथदिंडी जनजागर यात्रा महाराष्ट्रातील एकूण २१जिल्ह्यात मार्गक्रमन करीत ३००० कि.मी.चा प्रवास पूर्ण करून पंढरपुरात दि. २० फेब्रुवारी २०२३ला दाखल झाली. ही पंचग्रंथ दिंडी जनजागर यात्रेनी तीर्थक्षेत्र देहू येथील जगद्गुरु तुकाराम महाराज गाथा मंदिरातून दि.१ फेब्रुवारी २०२३ प्रारंभ केला व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कायदेशीर मार्गदर्शन करीत २१ दिवसाचा प्रवास पूर्ण पंढरपुरात दाखल झाली. शेतकरी वारकरी कष्टकरी महासंघाच्या जनजागर यात्रेची बैठक दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ ला तीर्थक्षेत्र देहू येथे झाली होती. त्याठिकाणी शेतकरी नेते धनंजय पाटील काकडे यांनी शेतकरी मंत्रालय होण्याची आवश्यकता असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार शेतकरी ग्रंथ दिंडी जन जगह यात्रेचे आयोजन केले होते. ग्रंथ दिंडी यात्रा टाळ व मृदंगाच्या आवाजात, शेतकरी मंत्रालय स्थापन होण्यासाठी पांडुरंगाला साकडे घालून, पंढरीनाथाचे दर्शन घेऊन चंद्रभागेतिरी पोहोचली. ग्रंथ दिंडीचा दि. २१ फेब्रुवारी २०२३ ला सकाळी ११ वाजता ग्रामगीता तत्त्वज्ञान दर्शन मंदिर, सांगोला रोड, पंढरपूर येथे समारोपिय कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भूवैकुंठ ग्रामगीता तत्त्वज्ञान मंदिराचे संचालक-सेवकराम दादा मिलमिले यांनी भूषविले. शेतकरी-वारकरी- कष्टकरी महासंघाचे अध्यक्ष श्री धनंजय पाटील काकडे व शेतकरी संघटना समन्वय समितीचे प्रमुख भगवान बोराडे यांनीही जनजागर यात्रा २१ दिवस सतत प्रवास करीत, परिश्रम घेऊन पूर्णत्वास नेली, याबद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक भाषण करताना शेतकरी-वारकरी-कष्टकरी महासंघाचे अध्यक्ष श्री धनंजय पाटील काकडे म्हणाले की, शेतकऱ्यांना न्याय व हक्क मिळाला पाहिजे, तसेच शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कृषीप्रधान देशात शेतकरी मंत्रालय स्थापन※ व्हायला पाहिजे होते ते का झाले नाही? लाखो भाविक, व वारकरी, पंढरपुरात दाखल होऊन, विठ्ठलाला दरवर्षी पाऊस येऊ दे व शेतकरी सुखी होऊ दे, अशी याचना करतो. आषाढी एकादशीला मुख्यमंत्री सुद्धा यावर्षी पाऊस येऊ दे, व शेतकरी सुखी होऊ दे म्हणून विठ्ठलाला साकडे घालतो, शेतकरी अजून पर्यत सुखी न होता, मात्र तो आत्महत्या करायला लागला. आता याला जबाबदार कोण? राजाची आणि प्रजेची मागणी जर एकच आहे तर शेतकरी सुखी का झाला नाही? मग तो आत्महत्या कां करायला लागला? या व्यवस्थेला जबाबदार कोण? शेतकरी आत्महत्या कां झाल्यात? भारताच्या पहिल्या घटना दुरुस्तीत १८ जून १९५१ ला पंडित जवाहरलाल नेहरू हंगामी सभापती असताना, १५० शेतकरी विरोधी कायदे तयार करून शेतकरी संपविण्याचे कटकारस्थान कसे रचले गेले? याबद्दलची माहिती जागर यात्रेनी महाराष्ट्रातून प्रवास करीत असताना ग्रामस्थांना दिली. शेतकऱ्यांच्या समस्येचा मार्ग, सरळ व सुलभ होण्यासाठी कृषी प्रधान देशात शेतकरी मंत्रालय स्थापन झाले पाहिजे अशी केंद्र सरकारला शेतकरी नेते धनंजय पाटील काकडे यांनी मागणी केली. तसेच शेतकरी मंत्रालय साकार होण्यासाठी, आगामी २०२४ च्या विधानसभेत, लोकसभेत प्रतिनिधी निवडून पाठवावे, अशी विनंती केली.

भगवान बोराडे म्हणाले, भारत देशात दर पाच मिनिटांनी आत्महत्या होत आहेत, परंतु राज्य सरकार व केंद्र सरकार या बद्दल मात्र दखल घेत नाही. शेतकऱ्याला बळीराजा, पोशिंदा व ग्रामनाथा म्हटलं जाते, शासन चुकीचे धोरणे वापरून शेतकऱ्याचाच मात्र बळी दिल्या जात आहे. यासाठी ही व्यवस्था दुरुस्त झाली पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष सेवकराम भाऊ मिलमिले म्हणाले या देशात शेतकरी आत्महत्या होणे ही अतिशय चिंतेची बाब आहे. तुकाराम दादा गीताचार्य ग्रामस्वराज्याची कल्पना मांडून शेतकरी सुखी होण्याचे स्वप्न पाहिले होते. लोकांचे ऐकण्यासाठी लोकप्रतिनिधी असावे लागते परंतु आजचे चित्र मात्र आमदार खासदार हे पक्षाचे बहुले बनले आहे, हे लोकप्रतिनिधी नसून पक्षप्रतिनिधी आहे. सत्ताधीशांनी ग्रामीण व्यवस्था कोलमडून पाडली व औद्योगिक क्रांतीच्या विचारात शहरी विकास झाला. राजकीय पक्षाचा आदेश शिरसावंद्य मानुन त्याच्या आमदार, खासदारांना शेतकरी स्वतंत्र करता आला नाही? म्हणजेच ते लोकांचे प्रतिनिधी नसून ते पक्षाचे प्रतिनिधी आहेत. आणि एकही राजकीय पक्षांनी शेतकऱ्याला समस्येतून बाहेर काढले नाही. तर कर्जाच्या बोज्यात दाबून ठेवले. कारण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी विधान भवन, संसद मध्ये आहेत की नाही, अशी आता शंका वाटायला लागली? पक्षाच्या गुलामीत जगणाऱ्या आमदार, खासदारांना आता शेतकऱ्यांचे काही देणे घेणे राहिले नाही? शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी, शेतकरी नेते धनंजय पाटील काकडे यांनी शेतकरी मंत्रालयाची केलेल्या घोषणेची आवश्यकता असल्याचे सेवकराम मिलमिले साहेब यांनी समर्थन केले.

कार्यक्रमाला उपस्थित शाम तडस, प्रज्वल तरेकर, श्याम तडस, संगीता तरेकर, सुशीला वगरे, लक्ष्मीबाई पिसे, गौतम जाधव, शंकर थेंर, बापूराव दरवे, इंदुबाई गायकवाड, चंद्रभागा गवारे, विमलबाई पवार, सुमनबाई कांडे, बेबी कोकाटे, सरला पवार, प्रतीक्षा पवार, अरुणा चोपकर इत्यादी महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राहुल चौधरी यांनी केले. कार्यक्रमाला असंख्य महिला पुरुष उपस्थित होते.

**- धनंजय पाटील काकडे, अध्यक्ष : शेतकरी-वारकरी-कष्टकरी महासंघ**

# भावस्पर्शी लेखनाचे धनी-कुसुमाग्रज

मराठी भाषेला महानुभवापासून ते अगदी अलिकडच्या मोबाईल युगातील मराठी परंपरेचा एक दीर्घ असा वारसा आहे. ज्ञानेश्वरांपासून ते अगदी अत्याधुनिक काळात आणि युवा साहित्य अकादमी विजेता लेखक प्रणव सुखदेव पर्यत मराठी बोली आणि मराठी प्रादेशिक बोली असा फरक केला गेला असला तरी या दोन्हीमध्येही मराठी साहित्य निर्मिती ही विपुल झाली आहे. विपुलतेचे प्रमाण हे मराठी बोलीला एकदाच प्राप्त झाले नाही तर त्यासाठी प्राचीन मराठी वाङ्मयापासून ते आधुनिक मराठी वाङ्मयापर्यतचा वारसा लाभला आहे. या वारसा परंपरेतील एक नाव म्हणजे विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज. कुसुमाग्रजांनी मराठी कविता अत्युच्च पातळीवर नेऊन ठेवली असली तरी त्यांनी आपल्या भाषेचा अभिमान राखताना इतर भाषांचाही त्यांनी मान ठेवला म्हणून भारत सरकारतर्फे त्यांना ज्ञानपीठ पुरस्काराने गौरवण्यात आले.

कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी म्हणजेच २७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात येतो. कवी कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याच्या निमित्ताने २७ फेब्रुवारी हा दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय २१ जानेवारी २०१३ रोजी महाराष्ट्र सरकारने घेतला. परंतु, याच दिवसाला अनेक जण 'मराठी राजभाषा दिन' असेही म्हणतात. मात्र, महाराष्ट्र सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने १० एप्रिल १९९७ रोजी काढलेल्या परिपत्रकात १ मे हा 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा करण्यात यावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तसा तो महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून १ मे रोजी साजरा करण्यात येत होता. परंतु, कालांतराने तो विस्मृतीत गेला. त्यामुळे १९९७ ला शासनाला पुन्हा परिपत्रक काढावं लागलं. २८ एप्रिल ते ३० एप्रिल १९९७ या तीन दिवशी विविध उपक्रम आयोजित करुन १ मे रोजी समारंभपूर्वक सांगता सोहळा करावा आणि त्याचदिवशी मराठी राजभाषा साजरा करावा असा निर्णय सरकारने घेतला. सरकारच्या या निर्णयामुळे १ मे रोजी मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात येतो. 'मराठी राजभाषा दिन' आणि 'मराठी भाषा गौरव दिना'प्रमाणेच २१ फेब्रुवारी रोजी जागतिक 'मातृभाषा दिन' साजरा केला जातो. युनेस्को या जागतिक पातळीवरील संस्थेनेच २१ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक मातृभाषा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे या दिवशी आपल्या मातृभाषेवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी २१ फेब्रुवारी रोजी दरवर्षी 'जागतिक मातृभाषा दिन' साजरा केला जातो.

१ मे रोजी साजरा होणारा 'मराठी राजभाषा दिन', २१ फेब्रुवारी रोजी साजरा होणारा 'जागतिक मातृभाषा दिन' आणि २७ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात येत असलेला 'मराठी भाषा गौरव दिन' हे तीनही दिन वेगवेगळे दिन विशेष आहेत हे समजून घेणे महत्वाचे आहे. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. मराठी कवितेला कुसुमाग्रजांनी एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. शिवाय महाराष्ट्राच्या बोलीला साहित्यात विशेष असे स्थान निर्माण करून देण्यात कुसुमाग्रजांचं मोलाचं योगदान आहे. मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. कुसुमाग्रज यांचा जन्म नाशिक येथे २७ फेब्रुवारी १९१२ रोजी झाला. विष्णू वामन शिरवाडकर यांच्या मोठ्या बहिणीचे नाव कुसुम होते. त्या नावावरूनच त्यांनी आपले कवी म्हणून कुसुमाग्रज हे नाव वापरले. कुसुमाग्रज यांनी आपल्या आत्मनिष्ठ प्रतिभेने आणि समाजनिष्ठ भावस्पर्शी लेखणीने जागतिक दर्जाचे लेखन केले.

मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने शाळा व कॉलेजमध्ये निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या जातात. तसेच ठिकाणी मराठी नाटके काव्य संमेलन व मराठी संगीताचा कार्यक्रम आयोजित केला जातो. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आपण सर्वांनी मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे. तरच मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला खरा अर्थ प्राप्त होईल. जीवनलहरी, किनारा, मराठी माती, वादळवेल अशा प्रकारचे त्यांचे प्रकाशित काव्यसंग्रह आहेत. तसेच दुसरा पेशवा ,वीज म्हणाली धरतीला, नटसम्राट, राजमुकुट ही त्यांची गाजलेली नाटके आहेत. मराठी भाषा ही नवव्या शतकापासून प्रचलित आहे व त्यांची निर्मीती संस्कृत पासून झाली आहे. महाराष्ट्र आणि गोवा या दोन्ही राज्यांची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी बोलणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही भारतातील तिसरी व जगातील पंधरावी भाषा आहे. माझ्या मराठीची बोलू कौतुके, परी अमृतातेही पैजा जिंके, ऐसी अक्षरे रसिके मेळविन'' असे लिहून संत ज्ञानेश्वर म्हणतात की मराठी भाषेचा गोडवा अमृतापेक्षा ही जास्त आहे. वैष्णव, जान्हवी, कल्पनेच्या तीरावर या कादंबऱ्या अशा अनेक साहित्य आणि कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेचे महत्त्व लोकांसमोर मांडले. कुसुमाग्रज यांचे मराठी साहित्यातील योगदान अवर्णनीय आहे त्यांनी त्यांच्या साहित्याची सुरुवात कवितेपासून केली. पुढे कथा कादंबरी ललित वाङ्मयातील नावाजलेली साहित्य रचना यांच्या लिखाणातून अवतरत गेली. तसे पाहिले तर आपल्या मराठी संस्कृतीचा वारसा खूप मोठा आहे. आपल्या मराठी माती मराठी चित्रपट, नाटक, काव्य, कविता इत्यादींचा फार मोठा वाटा आहे. अशा अनेक गोष्टींमुळे आजपर्यंत आपण हा मराठी वारसा जपत आलेलो आहोत. आपल्या या मराठी मातीत अनेक संत होऊन गेले. संत रामदास, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामाचे अनेक संतांनी मराठी भाषेतून स्तोत्र, श्लोक लिहिले आणि लोकांना मानवी कल्याणाचा संदेश तर दिलाच त्याचबरोबर मराठी भाषेचा ठसा लोकांवर लोकांचा मनावर उमटवला. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी संस्कृतीचे आणि मराठी भाषेचे रक्षण केले. एवढेच नव्हे तर अनेक प्रसिद्ध कलाकार या मराठी मातीत घडले. गानसम्राज्ञी लता मंगेशकर, सचिन तेंडुलकर, नाना पाटेकर ,माधुरी दिक्षित, पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, समाजसेवक अण्णा हजारे, समाज सुधारक बाबा आमटे तसेच उत्तम मराठी लेखक नाटककार पु ल देशपांडे यांसारखे अनेक रत्ने मराठी मातीतच घडली. पण या मराठी भाषेला लोक विसरत चालले आहेत. मायबोलीचा त्याग करून लोक इंग्रजी भाषेचा अवलंब करत आहेत . इंग्रजी ही काळाची गरज आहे नक्कीच त्याबद्दल दुमत नाही पण. त्यासाठी मराठी भाषेला विसरणे योग्य नाही. मराठी बोलणारा माणूस नोकरी-व्यवसाय उच्च शिक्षण या निमित्ताने जगाच्या कानाकोपऱ्यात गेलेला आहे. तिथे जाऊन हिंदी-इंग्रजी सारख्या इतर भाषा शिकतो आणि बोलतो परंतु आपल्या मराठी भाषेला आपण विसरत आहोत. त्या मायबोलीत आपण जन्मलो आणि आपल्याला घडवले त्या मायबोलीचा आपण आदर केला पाहिजे. आपण सर्वांनी मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे ही सुरुवात आपल्या घरापासून करायला हवी अशा गोष्टी मुळेच मराठी दिन साजरा केल्याचे खरे सार्थक होईल.

**- संजीवनी जाधव-पाटील, सहाय्यक संचालक (माहिती), कोकण विभाग, नवी मुंबई**

# केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजने अंतर्गतअर्ज सादर करावे!

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार जि.पालघर यांचे अधिनस्त असलेल्या जव्हार,मोखाडा,विक्रमगड व वाडा या चार ही तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजने अंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांकरीता खालील प्रमाणे उत्पन्न वाढीच्या योजना राबविण्यात येणार असून, योजनांचा प्रत्यक्ष लाभ घेण्याकरीता इच्छुक अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांकडून दिनांक २४/०२/२०२३ पर्यत अर्ज मागविण्यात येत आहे, अर्जाचा नमुना या कार्यालयामार्फत विनामुल्य उपलब्ध करून दिला जाईल. योजनेचे नांव गट व अर्जासोबत जोडावयाची आवश्यक ती कागदपत्रांचे छायांकित प्रत (स्वसाक्षांकित प्रती) पुढीलप्रमाणे : गट अ : अनुसुचित जमीतीच्या शेतकऱ्याने लागवड केलेल्या क्षेत्रास तारेचे कुंपण तयार करण्यासाठी DBTव्दारे अर्थसहाय्य देणे, अनुसुचित जमातीच्या शेतकरी लाभार्थ्यासाठी ५०० मोगरा लागवडीसाठी अर्थसहाय्य देणे. (२० आर क्षेत्र), अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांना शेततळयावर प्लास्टिक अस्तरी करणासाठी अर्थसहाय्य देणे. (२४X२४). अर्जासोबत जोडावयाची आवश्यक ती कागदपत्रांचे छायांकित प्रत (स्वसाक्षांकित प्रती) पुढीलप्रमाणे जातीचा दाखला किंवा जात वैद्यता प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, दारिद्र रेषेखालील दाखला, उत्पन्न दाखला (गतवर्षाचा), आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, ग्रामसभेचा ठराव व ग्रामपंचायत नाहरकत दाखला, कलर फोटो यापूर्वी योजनेचा लाभ न घेतल्याचे हमीपत्र/ स्वघोषणापत्र जमिनीचा ७/१२ उतारा. गट अ : अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांना विविध व्यवसाय करण्यासाठी डिबीटीच्या माध्यमातुन अर्थसहाय्य देणे. अर्जासोबत जोडावयाची आवश्यक ती कागदपत्रांचे छायांकित प्रत (स्वसाक्षांकित प्रती) पुढीलप्रमाणे जातीचा दाखला किंवा जात वैद्यता प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, दारिद्र रेषेखालील दाखला, उत्पन्न दाखला (गतवर्षाचा), आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, ग्रामसभेचा ठराव व ग्रामपंचायत नाहरकत दाखला, कलर फोटो, यापूर्वी योजनेचा लाभ न घेतल्याचे हमीपत्र/स्वघोषणापत्र. गट अ : अनुसुचित जमातीच्या बचतगटास विविध व्यवसाय करण्यासाठी डीबीटीच्या माध्यमातुन अर्थसहाय्य देणे. अर्जासोबत जोडावयाची आवश्यक ती कागदपत्रांचे छायांकित प्रत (स्वसाक्षांकित प्रती) पुढीलप्रमाणे बचतगट नोंदणी प्रमाणपत्र, बचत गटाचे बँक खाते पासबुक, बचत गटाच्या नावाचे ग्रां.पं. ठराव व नाहरकत दाखला, लाभार्थ्याचे फोटो रजिस्टर, बचतगटाची जागेबाबत स्वत:ची अगर खाजगी जागा भाडेतत्वार घेतलेले संमतीपत्र. (लाभार्थ्याचे जातीचे दाखले, आधार कार्ड, रहिवासी दाखले, यापुर्वी लाभ न घेतल्याचे हमीपत्र/स्वघोषणापत्र) गट क : आदिवासी संस्कृतीवर लघु चित्रपट तयार करणे (Short Film) अर्जासोबत जोडावयाची आवश्यक ती कागदपत्रांचे छायांकित प्रत (स्वसाक्षांकित प्रती) पुढीलप्रमाणे बचतगट नोंदणी प्रमाणपत्र,बचत गटाचे बँक खाते पासबुक,बचत गटाच्या नावाचे ग्रांम पंचायत ठराव व नाहरकत दाखला, लाभार्थ्याचे फोटो रजिस्टर, बचतगटाची संमतीपत्र. लाभार्थ्यांचे जातीचे दाखले,आधार कार्ड,रहिवासी दाखले, यापुर्वी लाभ न घेतल्याचे हमीपत्र/ स्वघोषणापत्र)(स्थानिक पातळीवरील लघु चित्रपट तयार करण्याचा अनुभव असणाऱ्या गटास प्राधान्य देण्यात येईल.) लाभार्थ्यांना व्यक्तिश: एकाच योजनेकरिता अर्ज दिला जाईल व एकाच योजनेकरिता अर्ज करता येईल. यापुर्वी लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी अर्ज करू नये. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २४/०२/२०२३ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत राहील. लाभार्थ्यांनी या पुर्वी या कार्यालयात सादर केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येत असून इच्छुक लाभार्थ्यांनी नव्याने अर्ज करणे बंधनकारक आहे. लाभार्थी निवड निकष : लाभार्थी निवड करतांना प्रथम आदिम जमातीचे लाभार्थी, दारिद्र रेषेखालील लाभार्थी, दिव्यांग (अपंग), विधवा, परितक्ता, निराधार महिला यांना प्राधान्याने योजनेचा लाभ देण्यात येईल. नंतर जसे अर्ज प्राप्त होतील त्यातील कमी उत्पानापासून ते जास्त उत्पन्नापर्यत यादी तयार करुन त्यानुसार लाभ दिला जाईल. आवश्यक ती कागदपत्रे, अर्जाची जेष्ठता, उपलब्ध निधी, प्राप्त लक्षांक व तालुकानिहाय निश्चित केलेला लक्षांक या निकषावर लाभार्थ्यांची निवड केली जाईल. असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, आयुषी सिंह यांनी केले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

### पोलीस ठाणे गांधी चौक लातूरच्या विशेष पथकाची कारवाई

# १२ मोटारसायकलीसह ४ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त




लातूर/प्रतिनिधी

लातूर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी लातूर जिल्ह्यात घडलेल्या मालाविषयक गुन्ह्याचे विशेषतः मोटारसायकल चोरी चे गुन्हे उघडकीस आणण्यात करिता निर्देशित केले होते. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे स्तरावरील पोलीस पथका कडून जिल्ह्यामध्ये घडलेल्या मालाविषयक गुन्ह्याचे विशेषतः मोटारसायकल चोरी संबंधाने घडलेल्या गुन्ह्याच्या तपासाचे अनुषंगाने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. सदर मोहीम अंतर्गत उपविभागीय पोलीस अधिकारी, लातुर शहर जितेंद्र जगदाळे यांचे मार्गदर्शन व पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे यांचे नेतृत्वात गांधी चौक पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अमलदार यांचे विशेष पथक तयार करून पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना वरिष्ठाकडून वेळोवेळी सूचना व मार्गदर्शन करण्यात येत होते. सदर पथक पोलीस ठाणे हद्दीतील घडलेल्या मालाविषयक गुन्ह्याच्या तपासाचे व उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करीत असताना दिनांक २०/०२/२३ रोजी सदरचे पथक सिद्धेश्वर यात्रेत पाई पेट्रोलिंग करीत असताना एक इसम मोटर सायकल ढकलत जात असताना दिसला पोलीस पथकाला संशय आल्याने त्यास पोलीस पथकाने ताब्यातील मोटार सायकल बाबत विचारपुस केली त्यांने उडवा उडवीचे उत्तर दिले. त्यास विश्वासात घेवून माहीती विचारली असता सदरची मोटरसायकल बसस्थानक लातुर येथुन चोरी केलेचे सांगीतले. तसेच कोल्हापूर पुणे अंबाजोगाई व लातूर लातूर शहरातून विविध ठिकाणाहून इतर आणखीन ११ मोटरसायकल चोरी केल्याचे कबूल केले. त्यावरून सदरच्या विविध कंपनीच्या ११ मोटरसायकल व त्याच्या ताब्यातील एक मोटर सायकल अशा एकूण १२ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून आरोपी प्रकाश नागुराव मोरे वय ३३ वर्षे रा. भालगाव ता.केज जि. बीड. यास पोलीस ठाणे गांधी चौक गु.र.न - ७८/२३ कलम-३७९ भादवि मध्ये अटक करण्यात आली आहे. गांधी चौक पोलीस ठाण्याच्या पथकाने उत्कृष्टरित्या तपास करून मोटरसायकल चोरीच्या १२ गुन्ह्याची उकल करून १२ मोटार सायकलसह ०४ लाख ३५ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात व पोलीस ठाणे गांधी चौक चे पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे यांचे नेतृत्वात पोलीस अंमलदार दामोदर मुळे, रणवीर देशमुख , रणजित शिंदे, दत्ता शिंदे, भाऊसाहेब मंथलवाड सुदर्शन पाटील, शिवाजी पाटील, शिवराज अनंतवाड उपविभागीय कार्यालय शहर यांचे पथकातील, सफौ ढगे, पारडे, सोनटक्के यांनी पार पाडली.

# राज्यात वन औद्योगिक विकास महामंडळ सुरु करणार -सुधीर मुनगंटीवार

मुंबई/प्रतिनिधी

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासात मोठी भर घातली आहे. याच धर्तीवर आता वन औद्योगिक विकास महामंडळ (एफआयडीसी) सुरू करण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली. या माध्यमातून वन आधारित उद्योगांना चालना देण्यात येणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. वन विकास महामंडळाच्या नागपूर येथे झालेल्या विभागीय क्रीडा स्पर्धेच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. मुनगंटीवार म्हणाले की, क्रीडा स्पर्धा व्यक्तीमधील निकोपतेला चालना देते. वन विकास महामंडळाच्या विभागीय क्रीडा स्पर्धांनी ही निकोपता कर्मचाऱ्यांना शिकवली आहे. लवकरच वन विभागाच्या आणि वन विभाग विरुद्ध वन विकास महामंडळ अशा विभागीय क्रीडा स्पर्धा घेण्यात येतील. हे महामंडळ केवळ वन क्षेत्राच्या विकासासाठीच काम करीत नाही, तर वन विभागातील कर्मचाऱ्यांना एखाद्या कुटुंबाप्रमाणे मानत त्यांच्याही सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र काम करीत आहे. वन विकास महामंडळातील खेळाडूंनी सर्वच स्पर्धांमध्ये यश मिळवावे. वन विकास महामंडळातील खेळाडूंचे कौतुक यासाठी करावे लागेल की विदर्भातील उष्णतामान जास्त असतानाही ते मैदानी खेळांमध्ये प्राविण्य प्राप्त करीत आहेत. एफडीसीएमच्या खेळाडूंचा चपळता व कार्यकर्तृत्वाच्या बाबतीत चित्ता असा उल्लेख करीत मंत्री मुनगंटीवार यांनी उपस्थित खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय काम करायचे असेल तर शारीरिक स्वास्थ्यही तितकेच महत्वाचे आहे. खेळांसोबत सांस्कृतिक कार्यक्रम देखील महत्वाचे आहे. त्यामुळे वन विकास महामंडळाने सांस्कृतिक महोत्सव देखील घ्यावे, असे आवाहन मंत्री श्री.मुनगंटीवार यांनी केले. वन विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांवर मोठी जबाबदारी आहे. राज्यातच नव्हे तर देशात वन विभागाचे काय सर्वोत्तम ठेवण्याचे मोठे आव्हान सर्वापुढे आहे. नुकत्याच आलेल्या राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार २ हजार ५५० वर्ग किलोमीटरचे वनक्षेत्र महाराष्ट्रात वाढले आहे.




कांदळवनांमध्येही १०२ वर्ग किलोमीटरची वाढ झाली आहे. त्यामुळेच केंद्रीय अर्थसंकल्पीय भाषणात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी कांदळवन संवर्धनाची संकल्पना देशभरात राबविण्याची घोषणा केली, असे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी कार्यक्रमात गौरवाने नमूद केले. यावेळी व्यासपीठावर वन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विकास गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक संजीव गौर, मुख्य वनसंरक्षक रंगनाथ नाईकडे, प्रादेशिक व्यवस्थापक सुमित कुमार, विभागीय व्यवस्थापक ए.आर. प्रवीण, नागपूरचे उपवनसंरक्षक भरतसिंह हाडा आदी उपस्थित होते.

## कामतघर परिसरात चैन स्नाचिंगच्या घटनांवर सीसीटीव्हीच्या तिसऱ्या डोळ्याची नजर



भिवंडी/अभिजित हिरे

भिवंडी शहर परिसरात चैन स्नाचिंग व वाहन चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीची भावना वाढीस लागली आहे. शहरातील कामतघर, ओसवाल पार्क, भारत कॉलनी या भागात चैन स्नाचिंगच्या चोऱ्यांच्या घटना वाढीस लागल्याने स्थानिक माजी उपमहापौर मनोज काटेकर यांनी पुढाकार घेत कामतघर मुख्य रस्ता, भारत कॉलनी, ओसवाल वाडी, पिस पार्क येथील मुख्य राहादरीच्या रस्त्यांवर स्वखर्चातून तब्बल १८ सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतन काकडे यांच्या शुभहस्ते या सीसीटीव्ही कॅमेरांचे लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी माजी शिक्षण समिती सभापती सुंदर नाईक, गोपीनाथ काटेकर, विशाल भोईर, शरद म्हात्रे, राम पाटील, रजनीश पाटील यांसह पोलीस अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमा बद्दल नागरीकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या माध्यमातून मंद्रूप हद्दीत जनजागृती सुरू; सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांचा उपक्रम

सोलापूर/प्रतिनिधी

ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या माध्यमातून जनजागृती महत्त्वाची असून मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व गावांमध्ये बैठका घेऊन प्रभावीपणे यंत्रणा राबविण्यात येत असून याची यशस्वी वाटचाल सुरू आहे. हा उपक्रम मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे त्यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या अंतर्गत जिल्ह्यातील मालमत्तेसंदर्भात व शरिराविरूध्द होणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्याकरिता मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व गावांमध्ये ग्राम सुरक्षा यंत्रणेची प्रभावीपणे कार्यवाही करण्यात आली आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून हद्दीतील सर्व गावांमध्ये होणाऱ्या चोऱ्या, दरोडा, आग, जळिताच्या घटना, लहान मुले हरवणे, शेतातील पिकांची होणारी नुकसान, चोरी, गंभीर अपघात, वन्य प्राण्यांवर हल्ला, पूर, भूकंप आदी सर्व घटनांची सुरक्षा यंत्रणेची गावाला एकाचवेळी सूचना देण्यासाठी व त्यांना मदतीला बोलवण्यासाठी ग्राम सुरक्षा नियंत्रणाची अंमलबजावणी महत्त्वाची ठरत आहे. या माध्यमातून गावातील लोकांना सूचना देणे, सावध करणे योग्यवेळी यंत्रणेचा वापर करणे, महिन्यातून किमान तीनवेळा ग्राम सुरक्षा यंत्रणेचा वापर करणे. तसेच ग्रामपंचायतीच्या वार्षिक आराखड्यात ग्रामसुरक्षा यंत्रणेचा समावेश करणे आदी उपक्रम या मोहिमेंतर्गत राबविण्यात येणार आहेत. दरम्यान मालमत्ता व ग्रामस्थांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यात करण्यात आली असून यामध्ये सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील, तंटामुक्त अध्यक्ष, पत्रकार, कोतवाल, रेशन दुकानदार, अंगणवाडीसेविका, आशासेविका, आरोग्यसेविका, डॉक्टर, शिक्षक, विकास सोसायटीचे चेअरमन आदींचा समावेश आहे. मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व गावांमध्ये बुधवार २२ फेब्रुवारीपासून सर्व गावांमध्ये ग्रामसुरक्षा यंत्रणा कशी राबवावी, याबाबत प्रशिक्षण समितीच्या सदस्यांना देऊन जगजागृती करणार आहोत. गावामध्ये ग्रामसुरक्षा यंत्रणा प्रभावीपणे राबवण्यासाठी ग्रामपंचायतीला येणाऱ्या अडीअडचणी सोडवणे व त्यांना मार्गदर्शन करणे आणि ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या हेल्पलाईन १८००२७०३६०० या क्रमांकाद्वारे नागरिकांना आवाहन करण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या माध्यमातून कामात पारदर्शकता आणण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांनी सांगितले.



## उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२२ करिता मुदतवाढ

मुंबई : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार देण्यात येतात. सन २०२२ च्या पुरस्कारासाठी दिनांक १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/ छायाचित्रे/ वृत्तकथा यांच्या प्रवेशिका दि. ३१ जानेवारी २०२३ पर्यंत मागविण्यात आल्या होत्या, तथापि, प्रवेशिका पाठविण्यास ८ मार्च २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२२चे माहितीपत्रक/ अर्जाचे नमुने महासंचालनालयाच्या dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच राज्यातील विविध भागातील स्पर्धकांना संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांना, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घेता येईल.

## गुढीपाडवा, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांत आनंदाचा शिधा

मुंबई : गुढीपाडवा तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांत आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. याचा लाभ १ कोटी ६३ लाख शिधा पत्रिकाधारकांना होईल. यापूर्वी दिवाळीत हा आनंदाचा शिधा देण्यात आला होता. अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व आणि नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधा पत्रिकाधारक शेतकऱ्यांना १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर आणि १ लिटर पामतेल असा आनंदाचा शिधा गुढी पाडव्यापासून पुढील १ महिन्याच्या कालावधीसाठी ई-पॉसद्वारे १०० रुपये प्रतिसंच असा सवलतीच्या दरात दिला जाईल. ई-पॉसची व्यवस्था नसलेल्या ठिकाणी ऑफलाईन पद्धतीने हा शिधा दिला जाईल. हा आनंदाचा शिधा देण्याकरिता आवश्यक शिधा जिन्नसांची खरेदी करण्याकरिता महाटेंडर्स या ऑनलाईन पोर्टलद्वारे २१ दिवसांऐवजी १५ दिवसांच्या कालावधीत निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. २०२२ मध्ये दिवाळी सणानिमित्त शिधाजिन्नस खरेदीसाठी पार पडलेल्या निविदा प्रक्रियेत २७९ प्रति संच या दरानुसार ४५५ कोटी ९४ लाख आणि इतर अनुषंगीक खर्चासाठी १७ कोटी ६४ लाख अशा ४७३ कोटी ५८ लाख इतक्या खर्चास देखील मान्यता देण्यात आली.

### मॅनहटन कम्युनिटी कॉलेज समवेत करार

# कौशल्य विकासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारण्यास होईल मदत-दीपक केसरकर



मुंबई/प्रतिनिधी

मॅनहटन कम्युनिटी कॉलेज बरो सोबतच्या करारामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण कमी खर्चात उपलब्ध होणार असून कौशल्य विकासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारण्यास आणि रोजगार उपलब्ध होण्यास देखील निश्चितच मदत होईल, असा विश्वास शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केला. शालेय शिक्षण विभाग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवीत आहे. याअंतर्गत जागतिक दर्जाच्या नामांकित शिक्षण संस्थांसोबत करार करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र आणि न्यूयॉर्क येथील सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क मॅनहटन कम्युनिटी कॉलेज बरो यांच्यादरम्यान परस्पर शैक्षणिक सहकार्य विकसित करण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री केसरकर यांच्या उपस्थितीत मंगळवारी सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार पात्र विद्यार्थ्यांना बरो ऑफ मॅनहटन कम्युनिटी कॉलेज ऑफ द सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क (बीएमसीसी) मध्ये केवळ २० टक्के शुल्कात उच्च दर्जाचे शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांना आणि विद्यार्थ्यांना विदेशात शिक्षण व प्रशिक्षणास प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्याचबरोबर संशोधन, अध्यापन, अभ्यासक्रम आदी क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढविले जाणार आहे. शालेय शिक्षण विभाग आणि मॅनहटन कम्युनिटी कॉलेज बरो यांच्यादरम्यान झालेल्या या करारावर शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांनी, तर मॅनहटन कम्युनिटी कॉलेज बरोच्या वतीने शिक्षण विभागाचे अध्यक्ष अँथनी मुनरो यांनी स्वाक्षरी केली. मंत्री श्री. केसरकर यांच्या शासकीय निवासस्थानी झालेल्या या कराराप्रसंगी मॅनहटन कम्युनिटी कॉलेज बरोचे उपाध्यक्ष संजय रामदत, शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक डॉ.कैलास पगारे, राजभवन येथील उपसचिव प्राची जांभेकर आदी उपस्थित होते.

## भिवंडीत पद्मानगर येथील शासकीय जागेवर अनधिकृत शॉपिंग कॉम्प्लेक्स तोडण्याचे न्यायलायचे आदेश!




भिवंडी/अभिजित हिरे

भिवंडीतील पद्मानगर भाजी मार्केट मधील मौजे कामतघर हद्दीतील शासनाच्या महसूल विभागाच्या नावे सर्व्हे क्रमांक ४२/अ/३ ही ६० गुंठे जागा आहे. मात्र सदर जागा भिवंडी ग्रुप विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या ताब्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी देण्यात आली होती. मात्र या जागेवर शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारून ६७ गाळे उभारण्यात आले असून लाखो रुपयांना येथील दुकाने विकण्यात आली. या बाबत काँग्रेसचे माजी नगरसेवक सिद्धेश्वर कामूर्ती यांनी हे शॉपिंग कॉम्प्लेक्स अनधिकृत असून महापालिका आणि महसूल विभागाकडे तक्रार करून सर्व अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याची मागणी वारंवार केली मात्र कोणतीच कारवाई होत नसल्याने त्यांनी मुंबई न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती त्यावर न्यायालयाने हे अनधिकृत शॉपिंग कॉम्प्लेक्स तोडण्याचे आदेश महापालिकेला देण्यात आले आहे. त्यामुळे लाखो रुपये खर्च करून विकत घेतलेल्या व्यापाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले असून दुकान तोडण्याच्या कारवाईची टांगती तलवार कायम आहे.


## जाहीर नोटीस

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचे हद्दीतील मिळकत गावमौजे दहीसर, ता. वसई, जि. पालघर येथील स.न. ८५/प्लॉट नं. १०६ या मिळकतीचे मालक श्री. मेरी समीर परेरा व समीर लेस्ली परेरा यांचेकडून आमचे अशिल जस्मीना रजनिकांत पटेल, राहणार- सरदार पटेल सोसायटी, नेहरू रोड, विलेपार्ले पूर्व मुंबई, ५७ विकत घेऊ इच्छित आहेत. तरी आमचे अशील या नोटीसीद्वारे कळवित आहेत की, नमूद मिळकतीवर कोणाचाही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या कागदपत्रासोबत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत ॲड. संजीवनी प्र.राणे यांचे कार्यालयात व मो.नं. वर आपली हरकत त्वरीत कळवावी. तसेच १५ दिवसांचे आत वरील मिळकतीवर कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, कोणाचाही हक्क, हितसंबंध व हरकत नाही, असे गृहीत धरून पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. तदनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व आमचे अशील त्याला जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : वसई

दिनांक : २३/०२/२०२३

सही/-

ॲड. संजीवनी प्र. राणे

उच्च न्यायालय, कार्यालयीन पत्ता- १०३, मंदार अपार्टमेंट, को. ऑप. हौ.सो. पटवर्धन वाडा, ब्राम्हण आळी, पापडी, वसई (पश्चिम) ता. वसई, जि. पालघर मो.नं. ९२८४८१०२८३


# ऊर्ध्व प्रवरा प्रकल्पाच्या कामास गती देणार ५ हजार १७७ कोटींच्या खर्चास सुधारित मान्यता; १८२ गावांना सिंचनाचा लाभ

मुंबई/प्रतिनिधी

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यामधील उर्ध्व प्रवरा प्रकल्पाच्या कामास गती देण्यासाठी ५१७७.३८ कोटींच्या खर्चास सुधारित मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यामुळे ६८ हजार हेक्टर जमिनीला सिंचनाचा थेट लाभ होणार आहे. प्रवरा नदीवर निळवंडे गावाच्या वरील बाजूस हे दगडी धरण बांधण्यात येत असून धरणातून डावा कालवा सुरु होऊन तो ८५ किलोमीटर लांब आहे.

नदीच्या उजव्या तीराने जाणारा कालवा ९७ किलोमीटर आहे. या दोन्ही कालव्यातून ६८ हजार हेक्टर सिंचन होणे अपेक्षित आहे. २०२७ पर्यंत या प्रकल्पाचे कालव्यासह संपूर्ण बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे. हा प्रकल्प पूर्ण होताच अकोले, संगमनेर, राहुरी, राहाता, कोपरगाव तसेच नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील अवर्षणप्रर्वण भागातील १८२ गावांना सिंचनाचा लाभ होईल.

27 FEB TO 05 MARCH 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 2/25/2023 7:39 PM Page 1



पान १ वरून....

## शेतीच्या वादातून भयानक हत्याकांड ...

मंगळवेढा पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी येऊन तिन्ही मृतदेह पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठवून दिले, तर फिर्यादी दत्तात्रयाच्या फिर्यादीवरून आरोपी समाधान महादेव लोहार (३२) याला अटक केली. चौकशीत समाधान याने आपला गुन्हा कबुल करताना शेतीच्या बांधावरून झालेल्या वादामुळे आपण या तिन्ही महिलांची डोक्यात कुदळ घालून तसेच दगडाने ठेचून हत्या केल्याचे कबुल केले. या प्रकरणी पोलिसांनी समाधानवर तिहेरी हत्येचा गुन्हा दाखल केला असून त्याला न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने २८ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. या प्रकरणी मंगळवेढा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक माने अधिक तपास करीत आहेत.

## शुल्लक वाद विकोपाला गेला...

भागातील बालकंजी बारी शाळेजवळ अशोक वाघमारे हा उभा असतानाच दोघा आरोपींनी अचानक येऊन त्याच्यावर धारधार शस्त्राने हल्ला केला आणि डोक्यात दगड घातला त्याला जागीच ठार केलं आणि त्यानंतर घटनास्थळावरुन पळ काढला होता.अशोकच्या खुना प्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक पोलीस व उल्हासनगर गुन्हे शाखेचे पथक समांतर तपास करत असतानाच १९ फेब्रुवारी रोजी उल्हासनगर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र अहिरे यांना गुप्त माहितीच्या आधारे दोन्ही आरोपींचा ठावठिकाणा लागला होता.त्यानंतर दुसरा आरोपी अमित हा अंबरनाथ शहरात लपून बसल्याची माहिती मिळताच, गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने अंबरनाथमधून त्याला ताब्यात घेतले. दरम्यान, दोघांना उल्हासनगर गुन्हे शाखेच्या कार्यलयात आणून त्यांच्याकडे चौकशी केली असता, दोघांनी हत्या केल्याची कुबली पोलिसांना दिली. त्यानंतर दोघांना मध्यवर्ती पोलिसांच्या ताब्यात देण्यात आलं.मध्यवर्ती पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड आणि तपास अधिकारी पोलीस निरीक्षक सुहास आव्हाड आणि त्यांची टीमने आरोपीची सखोल चौकशी सुरु केली.

## मोबाईलवरून त्यांच्यात वाद ...

चौकशी केली असता, प्रामुख्याने नाशिक शहर आणि शहरालगतच्या ओझर, पिंपळगाव, आडगाव परीसरात असे रबर बॅन्ड विक्री होत असल्याची माहीती मिळाली. याशिवाय मयतास घटनेच्या चार ते पाच दिवस अगोदर मारण्यात आले असल्याचा अभिप्राय वैद्यकीय अहवाल पोलिसांना मिळाला होता. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या एका पथकाने घटनास्थळ परीसरात मिळून आलेल्या भौतिक व तांत्रिक बाबींचे अचूक विश्लेषण केले. या विश्लेषणाच्या आधारे खेरवाडी परिसरातून शरद वसंत शिंदे आणि आलीम लतीफ शेख (दोघे रा. खेरवाडी, ता. निफाड, दोघे मुळ रा. मानोली, ता. मानवत, जि. परभणी) यांना ताब्यात घेण्यात आले. ताब्यातील दोघांनी आपला गुन्हा कबुल केला. दोघे तरुण खेरवाडी येथील शेतकरी जगदीश संगमनेरे व संदीप संगमनेरे यांच्या शेतात सालदार म्हणून शेतीकाम करत होते. यातील जगदीश संगमनेरे यांनी मागील महीन्यात पेठ फाटा, नाशिक शहर परिसरातून हितेश नावाच्या मजूरास शेती कामकाजासाठी खेरवाडी येथे आणले होते. तेव्हापासून हितेश हा सालदार शरद व आलीम यांचेसोबत शेतीकाम करत होता. दिनांक ७ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या हितेश आणि शरद यांच्यात मोबाईल घेण्यावरून वाद-विवाद झाले. त्यात हितेश याने शरद व आलीम यास नाशिकहून पोरं घेवून येतो व तुमचा बेत पहातो अशी धमकी दिली होती. त्या धमकीचा राग मनात धरून आलीम याने हितेशच्या डोक्यात लोखंडी गजाने प्रहार केला. त्या हल्ल्यात हितेश रक्तबंबाळ होत जमीनीवर कोसळून मयत झाला. याच दरम्यान त्यांचे मालक जगदीश संगमनेरे, संदीप संगमनेरे व जगदीश यांचा मुलगा योगेश संगमनेरे असे त्याठिकाणी आले. त्यावेळी घटनास्थळावर घडलेला प्रकार पाहून गावात बदनामी होईल तसेच बटाईने करत असलेली शेती जाईल आणि शेती कामास पुन्हा मजूर मिळणार नाही यादृष्टीने मालक जगदीश व संदीप यांच्या सांगण्यावरून सालदार शरद याने बाजूस पडलेल्या कु-हाडीने हितेशच्या गळ्यावर व मानेवर घाव घालून त्याचे धड व शीर वेगळे केले. त्यानंतर हितेशच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी त्यांची सर्वानी मिळून मृतदेह व शीर हे वेगवेगळ्या गोणपटात टाकून त्यास तारेने बांधून त्यांचेकडील स्विफ्ट कारममधून सायखेडा गावाच्या दिशेने जावून सायखेडा गावातील गोदावरी नदीवरील पुलावरून मृतदेह व शीर असे नदीत फेकून दिले. यावेळी संदीप व योगेश हे मोटरसायकलने स्विफ्ट गाडीच्या पुढे पुढे चालून रस्त्यात काही अडचण येते का? याची चाचपणी करत होते. खूनाचा गुन्हा उघडकीस आणण्याकामी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, सायखेडा पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक पप्पू कादरी, पोउनि विजय गायकवाड, स्थानिक गुन्हे शाखेचे हे.कॉ. जालिंदर खराटे, पोना विश्वनाथ काकड, सुशांत मरकड, प्रितम लोखंडे, हेमंत गिलबिले, रविंद्र टर्ले, सचिन पिंगळ, कपालेश्वर ढिकले, नवनाथ वाघमोडे, प्रदिप बहिरम, हेमंत गरुड, किरण काकड आदींच्या पथकाने अहोरात्र मेहनत घेत हा क्लिष्ट आणि आव्हानात्मक गुन्हा उघडकीस आणला आहे. पोलीस पथकाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी तपास पथकास २५ हजाराचे बक्षीस जाहीर करून सर्वाचे अभिनंदन केले आहे.

## जमीन हडपण्याचा डाव अंगाशी...

यांनी पाटील यांना मी ५० लाख रूपये देतो पण मला सिक्युरिटी म्हणून काही तरी लिहून पाहिजे असे सांगितले. त्यावर डॉ.पाटील यांनी झंवर यांना डॉ.शिरगावी हे गोकाक येथील आपली मोक्याची२२गुंठे जागा त्यांना लिहून देण्यास तयार आहेत असे सांगितले. त्यानुसार शिरगावी यांनी ५० लाखाच्या मोबदल्यात झंवर यांना ती जागा लिहून देण्याचे ठरले. या जागेचा करार करताना ५० लाखाच्या मोबदल्यात डॉ.शिरगावी यांनी दोन वर्षात २० लाख रूपये जादा देण्याचे ठरले आणि त्याप्रमाणे करार झाला. त्यावेळी राजेश झंवर यांनी ठरल्याप्रमाणे डॉ.शिरगावी याच्या कडून त्या जागेची कागदपत्रे आपला भाऊ मनोज झंवर याच्या नावे तयार करून घेऊन डॉ.सचिन शिरगावी यांना डॉ.शिवानंद पाटील याच्या मध्यस्थीने ५० लाख रूपये दिले. डॉ.शिरगावी याची २२ गुंठे बिगर शेती जमीन ही मोक्याची होती.या जमीनला भाव ही जास्त येत होता. शहरात मोक्याची जमीन असल्याने याची किमंत जवलपास २ कोटी रूपये होत होती. तथापी शिरगावी यांनी त्या जमीनीवरती ५० लाख रूपये घेतले होते. ही जमीन बिगर शेती असल्याने व याची मिकंत २ कोयी रूपये होत असल्याने या जमीनचा मोह राजेश झंवर यांना झाला. ही जमीन दिलेल्या रक्कमेत आपल्या घशात घालण्याचा त्याचा इरादा होता. या घटनेला दोन वर्ष झाली. ५० लाख रूपये झंवर यांनी व्याजाने दिले असल्याने त्यांनी त्यावर व्याज अकारणी केली होती. ती रक्कम जवळपास ७० ते ७५ लाख रूपयाच्या आसपास जात होती.एवढी रक्कम शिरगावे हे परत देवू शकत नाहीत याची खात्री झंवर यांना होती म्हणून त्यांनी त्या पैशासाठी डॉ.शिरगावे यांच्याकडे तगादा लावला होता.एक तर मला ७५ लाख रपये दे नाही तर माझ्या भावाच्या नावे या जागेचा इतक्या रक्कमेत व्यवहार कर असे ते त्याला सांगत होते.२ कोटीची जमीन ७५ लाख रूपयात देणे म्हणजे आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखेच होते. तरी ही डॉ.शिरगावे यांनी झंवर यांना दोन टप्पयात ७० लाख रूपये देतो मला माझी जमीन परत करा असे सांगत होते. म्हणून डॉ.शिरगावे यांनी झंवर यांना एकदा ३९ लाख रूपये व एकदा ३१ लाख रूपये देण्याची तयारी दर्शवली. परंतु झंवर याना ती २२ गुंठे जमीन पाहिजे असल्याने त्यांनी ही रक्कम घ्यायला नकार दिला. मला आणखीन रक्कम पाहिजे असा तगादा त्यांनी शिरगावी याच्याकडे लावला. झंवर यांना आपली मोक्याची जमीन कमी किंमतीत पाहिजे आहे हे डॉ.शिरगावी यांनी ओळखले होते. झंवर हे पैसे घेऊन ही जमीन सोडायला तयार नसल्याने डॉ. शिरगावी यांनी मध्यस्थी डॉ.शिवानंद पाटील यांना बोलावून या व्यवहारातून मार्ग काढण्यास सांगतिले. डॉ.शिवानंद पाटील यांनी झंवर यांना सांगून पाहिले तरी ही झंवर यांनी ती जमीन सोडण्यास नकार दिला. रक्कम घेऊन ही झंवर हे जमीन सोडण्यास नकार देत आहेत हे बघून डॉ.सचिन शिरगावी हे त्याचेवर चिडून होते. काही ही करून यातून मार्ग काढायला हवा असे त्यांनी मित्र डॉ.शिवांनद पाटील यांना सांगितले. त्यानुसार दोघांनी प्लॅन करून राजेश झंवर याला चांगलाच धडा शिकवायचा आता तर त्याला पैसे ही दयायचे नाहीत शिवाय त्याला या जगात ठेवायचे ही नाही असा विचार त्यांनी केला. राजेश झंवर याची गेम करायची तर कोणाला तरी त्याच्या खूनाची सुपारी ही दिली पाहिजे म्हणून त्यांनी गोकाक येथील शाफत इर्शाद अंमद त्रासगर याची भेट घेतली. तो रेफ्रिजेटर दुरूस्तीचे काम करीत असला तरी तो सराईत गुन्हेगार म्हणून त्याची ओळख होती. डॉ.शिवांनद पाटील यानी त्याला बोलावून घेऊन झंवर याच्या खूनाची सुपारी दिली. त्यावेळी शाफत त्रासगर याने आपल्या ओळखीचे मोहीन पटेल आणि आबुताला याची भेट घेऊन त्यांना ही या कामात सहभागी करून घेतले. ते दोघे ही सराईत गुन्हेगारच होते. डॉ.शिरगावी आणि डॉ.पाटील यांनी त्रासगर याच्या मदतीने त्या दोघांची भेट घेऊन झंवर याची गेम करा असे सांगितले.त्यापूर्वी डॉ.शिरगावी यांनी कोल्हापूरातील आपल्या एका मित्राकडून एक गावठी पिस्तुल ही खरेदी केले. दि.१० फेब्रूवारी २०२३ रोजी त्रासगर याने राजेश झंवर यांना फोन लावून काम असल्याचे सांगितले आणि तो आणि त्याचे दोन तीन मित्र झंवर याच्याघराकडे गेले. त्यावेळी घरात झंवर याची पत्नी आणि मुले होते.त्रासगर याने डॉ.शिरगावे याच्याशी झालेल्या व्यवहाराचे बोलायचे असल्याचे सांगून झंवर याना बाहेर बोलावून एका गाडीत बसविले. त्या गाडीतून त्यांनी त्याला घटप्रभा रोडवरील उजव्या काल्याजवळ आणले. संध्याकाळची वेळ असल्याने कालव्यजवळ कुणी नव्हते. नदी पात्राला लागून कालवा असल्याने पाणी ही भरपूर होते. रात्रीच्या वेळी तेथे झंवर याना आणून त्रासगर आणि त्याच्या मित्रांनी त्यांना डॉ.शिरगावी याच्याबरोबर झालेल्या व्यवहाराविषयी विचारणा करून त्याची जमीन सोडण्यास सांगितले तथापी राजेश झंवर यांनी नकार देताच त्रासगर मोहीन पटेल आणि आफताबला आणि त्याच्या इतर दोन मित्रांनी झंवर यांना लोंखडी रॉडने मारहाण करायला सरूवात केली.त्यात ते गंभीर रित्या जखमी झाले. त्याच्या डोक्यावर त्यांनी लोंखडी रॉडने प्रहार केल्याने त्याचे डोके फुटले होते. त्यातून ही झंवर हे आपला जीव वाचविण्यासाठी पळून जात असताना त्रसागर याने त्याच्या पोटात चाकूने सपासप वार केले. त्यासरशी ते जमीनीवर रक्ताच्या थारोळ्यात पडले. जागीच त्यांचा मृत्यू झाला.झंवर याचा खून केल्यानंतर त्यांनी त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा विचार केला.त्यांनी तसाच त्याचा मृतदेह उचलून उजव्या कालव्यात टाकला आणि तेथून ते आपल्या कारने निघून गेले. राजेश झंवर याची गेम केल्याची माहिती त्रासगर याने आपल्या मोबाईलवरून डॉ.शिवांनद पाटील यांना दिली. इकडे शुक्रवार दि.१० फेब्रुवारी रोजी राजेश झंवर हे घरातून गेल्याने ते परत न आल्याने त्याच्या पत्नीने गोकाक शहर पोलीस ठाणे गाठून पती राजेश झंवर याचे अपहरण केल्याचे तक्रार नोंदविली.त्या तक्रारीत त्यांनी राजेश झंवर याच्या बरोबर डॉ.सचिन शिरगावी याचा जमीनीचा वाद असल्याने त्या वादातून पतीचे अपहरण झाल्याचे सांगितले.यावरून पोलीसांनी डॉ.सचिन शिरगावी याना ताब्यात घेऊन त्याचेकडे राजेश झंवर यांच्या विषयी चौकाशी केली असता त्यांनी राजेश झंवर याचाा खून करून त्याचा मृतदेह घटप्रभा नदीच्या उजव्या कालव्यात टाकल्याचे सांगितले. त्यांच्या सांगण्यावरून पोलीसांनी या घटनेतील दुसरे संशयीत आरोपी डॉ.शिवानंद पाटील आणि शाफत त्रासगर यांना ही ताब्यात घेतले.त्यांनी ही राजेश झंवर याच्या खूनाची कबुली दिली होती. त्याचा खून करून कालव्यात मृतदेह टाकल्याचे त्यांनी सांगितले होते. गोकाक पोलीसांनी या कालव्यात राजेश झंवर याच्या मृतदेहाचा शोध घ्यायला सुरूवात केली परंतु त्याचा मृतदेह काही त्यांना सापडत नव्हता. दोन तीन दिवस त्या कालव्याचे पाणी उपसा त्यांनी बंद केले तरी ही त्यांना या कालव्यात त्याचा मृतदेह सापडत नव्हता. हा कालवा गोकाक जिल्हयातून बागलकोट जिल्हयात जात असल्याने तेथे ही जावून मृतदेहाचा शोध घेतला.पण मृतदेह काही सापडत नव्हता. पाच सहा दिवस रात्र आणि दिवस पोलीस झंवर याच्या मृतदेहाचा शोध घेत होते.संशयीत आरोपी पोलीसांना उलट सुलट सांगत होते. पोलीसांचे एक पथक मृतदेहाच्या शोधासाठी आहोरात्र झटत असताना आठ दिवसांनी गोकाक जवळील उपकालव्याच्या ८ किमी अंतरावर पंचनायकनहट्टी गावाच्या हद्दीत एका पाईप लाईनमध्ये कुजलेल्या अवस्थेत त्यांना राजेश झंवर याचा मृतदेह मिळून आला. पोलीसांनी तो मृतदेह बाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी गोकाक येथील सरकारी दवाखान्यात पाठवून दिला. पोलीस झंवर याच्या मृतदेहाचा शोध घेत असताना घटप्रभा कालवा, कौजलगी कालवा, गोकाक गोरगुद्दी येथील कालव्यात ही शोध घेत होता. परंतु मृतदेह हा उजव्या कालव्यातील पाण्यातून वाहत पंचनायकनहट्टी गावाच्या हद्दीतील उपकालव्यात आला होता. मृतदेह पाण्यात पुर्णपणे कुजला असल्याने तो ओळखता येत नव्हता. त्याची दुर्गंधी ही सुटली होती. परंतू मयत राजेश झंवर याच्या पत्नीने मयताच्या अंगावरील फाटक्या कपडयावरून तो मृतदेह आपली पती राजेश झंवर याचा असल्याचे ओळखले होते. या घटनेची लेखी फिर्याद मयत राजेश झंवर याच्या पत्नीने गोकाक पोलीसात दिली असल्याने पोलीसांनी राजेश सत्यनारायण झंवर (वय ५२) याचे अपहरण करून खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी डॉ.सचिन शिरगावी(वय३८)त्याचा मित्र डॉ,शिवानंद पाटील (वय ३५) शाफत त्रासगर आणि त्याचे दोन साथीदार मोहीन पटेल आणि आफताबला याचे विरोधात आयपीसी कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल केला. या घटनेतील मोहीन पटेल आणि अफताबला हे दोघे घटना घडल्यापासून फरार होते.पोलीस त्याचा शोध घेत होते.डॉ.शिरगावी डॉ.पाटील आणि त्रासगर यांना पोलीसांनी मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना सुरूवातीला १० फेब्रुवारी पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा तपास गोकाक शहर पोलीस ठाण्याचे पो.निरी.प्रकाश यातनुर उपनिरी. एस.डी घोरी आणि त्याच्या सहकाऱ्यांनी जिल्हा पोलीस प्रमख डॉ. संजीव पाटील याच्या मार्गदर्शनाखाली केला.

## दारूसाठी त्याला पैशाची गरज होती...

होते. रत्नागिरीतून सकाळी उठली की डिंगणी येथे आपल्या बहिणीच्या घरी जावून काही वेळ तेथे थांबून परत दुपार नंतर ती मच्छी विकण्यासाठी जात होती. वयाची ५०शी गाठलेली सईदा ही आपल्या कुटूंबासाठी कष्टाचे घाव सोसून रात्र आणि दिवस झटत होती. त्यातून तिला चार पैसे ही उरत होते. कष्टातून संसार फुलला की त्याचे सुख काही औरच असते. त्याच्या श्रमाला तोड नसते. सईदा सकाळी घरातून बाहेर पडली की, रात्री उशिराच परतत होती. त्यामुळे तिचा नवरा रिझवान हा तिला काही विचारत नव्हता. ती गाठीला गाठ मारून आपला संसार निटनेटका करीत होता. मुलांना काय पाहिजे काय नको हे ही ती पाहत होती. रोजच्या मच्छी विक्रीतून तिला किमान २०० ते ३०० रूपये राहत असल्याने त्यावर ती समाधान मानत होती. घरची आर्थिक परिस्थीत नाजूक असल्याने आपण मच्छी विकून संसाराला हातभार लावत आहे यातच ती सुखी होती. रोजच ती वाडया वस्तीवर मच्छी विकण्यासाठी फिरत असल्याने बरेच लोक तिला ओळखत होते. पिरंदवणे बौध्दवाडी येथे राहणारा जयेश रमेश गामरे हा २३ वर्षीय तरूण ही तिच्याकडून कधी कधी मच्छी घेत होता. तो सईदाला चांगले ओळखत होता. त्याला दारूचे व्यसन होते. सकाळ पासून रात्री पर्यत तो दारूच्या नशेत राहत असे. त्याला जर दारू मिळाली नाही तर तो सैरभैर होत होता. दारू पिण्यासाठी त्याला इतर लोकाकडून पैसे मागण्याची सवय होती. तसेच तो बायकाच्याकडे ही त्याची कायम वाईट नजर असायची. त्यातूनच तो बायकांची छेड ही काढत होता. अशा प्रकरणातूनच त्याचेवर गेल्या काही माहिन्यात विनयभंगाचा गुन्हा ही दाखल झाला होता. तरी ही तो सुधारला नव्हता. दारू पिण्यासाठी बायकाच्याकडे तो पैसे मागायचा त्यांनी पैसे दिले नाही तर त्याच्याशी अश्लिल वर्तन करून त्यांना लज्जा उत्पन्न होईल असे करीत होता. त्यामुळे चांगल्या बायका या त्याच्यापासून नेहमी लांबच राहत होत्या. सईदाशी त्याची तोंड ओळख असल्याने तो तिच्याकडे दारूसाठी पैसे मागत होता. एकदा दोनदा तिने त्याला पैसे ही दिले होते पण ते पैसे त्याने तिला परत दिले नसल्याने ती त्याला पैसे देत नव्हती. ती मच्छी विकून परतत असताना तो तिच्या आडवाटेला जात होता. काही तरी कारण सांगून तो तिच्याकडे पैसे मागत होता. पण ती काही त्याला पैसे देत नव्हती. तो तिच्यापेक्षा निम्या वयाचा असल्याने ती त्याला झिडकारत शिव्या ही देत होती. त्याला भिती दाखविण्यासाठी त्याला मारत ही होती. दि.१५ फेब्रुवारी रोजी ती नेहमी प्रमाणे सकाळी लवकरच मच्छी विकण्यासाठी बाहेर पडली. सकाळी दहा वाजेणच्या सुमारास ती डिंगणी येथील आपल्या बहिणीच्या घरी गेली. हल्ली उन्हाळा असल्याने व कडक ऊन पडत असल्याने ती त्या दिवशी दुपारपर्यत आपल्या बहिणीच्या घरीच राहिली. दुपारी ३ नंतर ती टोपली घेऊन मच्छी विकण्यासाठी गेली. सायंकाळी मच्छी विकून परत येत असताना जंगलातील भागात एका निर्जन ठिकाणी तिच्या आडवे जयेश गामरे हा आला. तो आधीच दारूच्या नशेत होता. त्याला अजून दारू पाहिजे होते. सईदाकडे मच्छी विकून पैसे आले आहेत याची त्याला कल्पना होती. तिच्याकडून दारूसाठी पैसे घ्यायचे असा विचार त्याने केला.तो तिच्या आडवे आल्यावर त्याने ये मावसे जरा थांब मला मच्छी पाहिजे असे सांगितले. यावेळी तिने मच्छी काही शिल्लक नाही उदया आणते असे सांगितले.पण तो काही ऐकायला तयार नव्हता.तो दारूच्या नशेत असल्याने ती त्याला बाजुला हो मुडदया म्हणत बाजुला हाकत होती. पण तो तिची वाट आडवून धरत होता. तो तिला काही पुढे सोडत नव्हता. मला मच्छी तर दे. नाहीतर मला दारूसाठी १०० रूपये दे असे म्हणत तो तिच्या मागे लागला. ती त्याला मच्छी ही नाही आणि पैसे ही नाहीत मला माझा संसार आहे. तुझ्या सारख्याच्या नादाला लागून माझी पोर बाळे रस्त्यावर आणू का? माझे ही हातावरचे पोट आहे मला जावू दे म्हणत तिने त्याला बाजुला ढकलले. तो दारूच्या नशेत असल्याने तो बाजुला जावून पडला. त्याच्या अंगला जरा से खरडले. त्याला राग आला. एक तर पैसे देत नाही मच्छी देत नाही आणि उलट मलाच पाडते म्हणून तो धडफडत उठला. पुढे जाणाऱ्या सईदाला त्याने आडवून धरले. तो तिच्याकडचे पैसे हिसकावून घेत असताना दोघात झटापट झाली त्यावेळी जंगलातील त्या निर्मनुष्य रस्त्यावर कोणीच नव्हते. अंधार पडत चालला होता. दुर कुठे तरी एकादा लाईटचा दिवा चालू होता. त्या झटापटीत तिची टोपली बाजुला दूर जावून पडली. त्याने ही तिला ढकलत खाली पाडले. आणि बाजुलाच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि तिच्या डोक्यात दोन तीनदा हाणला. त्यासरशी तिच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू होऊन जागीच तिचा मृत्यू झाला. तिचा आपल्या हातून खून झाल्याचे बघून त्याने तिला बाजुला फरफटत ओढत नेऊन एका झाडाच्या बाजुला टाकले आणि तेथून तो काहीच झाले नसल्याच्या अविर्भावात निघून गेला. इकडे सकाळी मच्छी विकण्यासाठी गेलेली सईदा रात्री उशिरा पर्यत घरी परत न आल्याने तिचा पती रिझवान आणि त्याची मुले चिंतेत होती. त्यांनी डिंगणी येथे तिच्या बहिणीच्या घरी चौकशी केली असता तेथे ही सईदा नसल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी तिचा वाडी वस्तीवरील जंगलातील रस्त्यात तिचा शोध घेतला पण तिचा कुठेच शोध लागत नसल्याने रात्री उशिरा त्यांनी रत्नागिरी पोलीस स्टेशन गाठून सईदा ही बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. दुसऱ्या दिवशी सकाळी संगमेश्वर पोलीसांना पिरदवणे जंगलातील निर्जन रस्त्यावर एका ५० वर्षीय माहिलेचा दगडाने ठेचलेला अवस्थेतील मृतदेह मिळून आला. बाजुलाच काही अंतरावर एक टोपली पडली होती.तिला काही अंतरावरून फरफटत आणल्याच्या खुणा ही दिसत होत्या. रत्नागिरी पोलीसा कडून एक ५० वर्षीय महिला बेपत्ता असल्याची माहिती त्यांना आधीच मिळाली असल्याने त्यांनी तशी माहिती रत्नागिरी पोलीसांना दिली. घटनास्थळी मयत महिलेच्या नातेवाईकांना घटनास्थळी बोलावून घेण्यात आले. रिझवान सय्यद यांनी मयत महिलेची ओळख तिच्या अंगावरील साडीवरून आपली सईदा ही असल्याचे संगमेश्वर पोलीसांना पटवली. पोलीसांनी घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रत्नगिरी येथील सरकारी रूग्णालयात पाठवून दिला. मयत सईदा ही मच्छी विकण्याचा धंदा करीत असल्याने तिचा अशाप्रकारे कोण खून करेल याची शंका पोलीसांना येत होती. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना घटना घडून पाच सहा दिवस झाले तरी या घटनेचा तपास काही लागत नव्हता. त्यामुळे ते संशयीत आरोपी पर्यत पोहचू शकत नव्हते. या घटनेसंदर्भात पोलीसांनी काही जणांच्याकहे चौकशी केली. सईदाचा खून हा पैशाकरिता झाला असावा अशी शंका पोलीसांनी होती. कारण घटनेच्या दिवशी मच्छी विक्री करून आलेले पैसे तिच्याजवळ नव्हते. या दरम्यान पोलीसांनी काही संशयीत तरूणावर नजर ही ठेवली होती. या घटनेचा तपास स्थानीक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करीत होते. त्याना या घटनेसंदर्भात एका गुप्त खबऱ्याने माहिती दिली की पिरदंवणे बौध्दवाडी येथील जयेश रमेश गामरे आणि मयत महिलेची घटनेच्या दिवशी भांडणे झाली होती. यावरून पोलीसांनी जयेश गामरे याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे मयत सईदा हिच्या खूनाविषयी चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना देत आपला गुन्हा कबुल केला. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी मयत सईदा हिच्या पतीच्या फिर्यादीवरून सईदा रिझवान सय्यद (५०) हिच्या डोक्यात दगड घालून खून केल्या प्रकरणी जयेश रमेश गामरे (२३)याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२, प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला २४ फेब्रुवारी पर्यतची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा तपास जिल्हा पोलीस अधिक्षक धनंजय कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड,तसेच पोलीस उप.विभागीय अधिकारी सचिन बारी यांच्या मार्गदर्शनाखाली संगमेश्वर पोलीसांनी केला.

## महिलेची हत्या करणारा दिसला...

भरण्याची तिला घाई झाली होती, कारण घरात इतरही कामे तिला करायची होती. दरम्यान मालेगावी गेलेला भास्कर हा मका विकून घरी आल्यानंतर त्याला त्याची पत्नी घरात व शेतात दिसली नाही. त्यामुळे तिचा तो शोध घेवू लागला. कांदा पिकाला पाणी भरतांना इतर लोक दिसत होते, पण सुमनबाई काही दिसत नव्हती, त्यामुळे भास्कर चिंताक्रांत झाला आणि मग त्याने ही गोष्ट आजूबाजूच्या शेतकऱ्यांना आणि नातेवाईकांना सांगितली, तेंव्हा सर्वानी त्याच्या शेतात धाव घेतली आणि बेपत्ता सुमनबाईला शोधू लागले, मात्र ती कुठेच मिळून आली नाही. दरम्यान काही गुराखी वनजमिनीच्या जंगलात गुरे चारायला घेवून गेले असता जंगलातील एका नाल्यात अर्धवट स्थितीत नग्नावस्थेत एका महिलेचा मृतदेह पुरलेला दिसून आला. ते गुराखी घाबरून गेले. त्यांनी ताबडतोब याची माहिती गावातील काही लोकांना दिली. ही माहिती मिळताच भास्कर बिचकुलेसह काही लोकांनी वनखात्याच्या नाल्याकडे धाव घेतली असता अर्धवट स्थितीत एक मृतदेह जमिनीत पुरलेला दिसला, त्यामुळे एकच खळबळ उडाली. या घटनेची माहिती मालेगाव तालुका पोलीस ठाण्याला कळवण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, उपनिरीक्षक विशाल पाटील पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले आणि घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी मालेगाव येथील शासकीय सामान्य रूग्णालयात पाठवण्यात आला. वनखात्याच्या जंगलात नाल्यामध्ये मिळालेला मृतदेह हा बेपत्ता झालेल्या सुमनबाईचा होता. तो नग्नावस्थेत होता. अज्ञात मारेकऱ्याने फावडीने किंवा धारदार हत्याराने तिला ठार मारून तिचा क्रूरपणे खून केला होता आणि पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह वनजमिनीत दगड व मातीखाली लपवला होता. मयताचे दोन्ही पाय घोट्यापासून तोडून टाकण्यात आले होते. मुंडकेही धडापासून वेगळे करण्यात आले होते. भास्कर बिचकुले यांच्या शेतापासून सुमारे एक कि.मी. अंतरावर मृतदेह आणून टाकण्यात आला होता. धडापासून जवळच दोन्ही पाय पडलेले होते आणि मृतदेह नग्नावस्थेत मिळाल्याने खळबळ उडाली होती. मारेकऱ्याने सुमनबाईचा कोणत्या तरी हत्याराने क्रूरपणे खून केला होता. या घटनेची खबर गावात व तालुकाभर पसरताच लोकांनी घटनास्थळी धाव घेतली. लोकांची गर्दी जमा झाली. मृतदेहाची केलेली भयानक अवस्था पाहून संतापाच्या प्रतिकिया उमटत होत्या. दरम्यान मालेगाव तालुका पोलीस ठाण्याला गुन्हा रजि. नं. ५६ / २०२३ ला भा.दं.वि. कलम ३०२ व २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. अतिशय क्रूर व भेदरवून टाकणारी घटना घडली होती. शेतात दुपारच्या वेळी कांदा पिकाला पाणी पाजणाऱ्या शेतकरी महिलेचा अज्ञात मारेकऱ्याने खून केला होता. मारेकऱ्याने सुमनबाईचा खून का व कशासाठी केला. शोध घेणे पोलिसांना आव्हानात्मक ठरले होते. या खुनाच्या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, उपविभागीय अधिकारी पुष्कराज सुर्यवंशी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक मयुर भामरे, मालेगाव तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत पाटील आदींनी घटनास्थळाला भेट देवून परिस्थितीची बारकाईने पहाणी केली. घटनास्थळी फॉरेन्सीक पथक व श्वान पथकास पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी ठिय्या मांडून अहोरात्र तपासाला सुरूवात केली. भौतिक पुरावे व प्रत्यक्षदर्शीनी बघितलेल्या आरोपीचे व मिळालेल्या वर्णनावरून पोलिसांनी मारेकऱ्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. तर तिकडे मारेकरीच चांदीचे वाळे घेवून करंजगव्हाण येथील एका सोनाराच्या दुकानात विकायला आला. त्याचा सोनाराला संशय आल्याने त्याने त्याच्याकडून वाळे विकत घेण्यास स्पष्टपणे नकार दिल्याने मारेकरी निघून गेला. दरम्यान या सोनाराने तातडीने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी त्याच्याकडून माहिती घेवून सी.सी.टी.व्ही. फुटेज मिळवले. फुटेजमध्ये मारेकरी स्पष्टपणे दिसत होता आणि तो परिसरातच फिरत असावा म्हणून पोलीस त्याला शोधू लागले. संशयित आरोपीचे मिळालेले वर्णन व त्याने परिधान केलेल्या कपड्यावरून शोध घेत असतांना तो डोंगराळे गावाच्या शिवारात असल्याची खबर पोलिसांना मिळाली. मग पोलीस पथकाने डोंगराळे गावाजवळील तलावाकडे धाव घेवून त्याला पकडण्याचा प्रयत्न केला, पण पाठलाग करणाऱ्या पोलिसांना चुकवण्यासाठी त्याने चक्क तलावात उडी मारली, मात्र त्यास पोहता येत नसल्याने तो पाण्यात गटांगळ्या खाऊ लागला. लक्षात येताच त्याचा पाठलाग करणारे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार शरद मोगल व दत्ता माळी यांनी जीवाची पर्वा न करता तलावात उडी घेवून त्याला वाचवले आणि तलावाबाहेर काढले. पोलिसांनी त्याला विश्वासात घेवून त्याच्याकडे विचारपूस केली असता आपण सोने-चांदीच्या दागिन्यासाठी तिचा खून केल्याची कबुली दिली. त्याचे नाव किरण ओमकार गोलाईत (वय ३२) रा. साजवहाळ, ता. मालेगाव, जि. नाशिक असल्याचे कळले. किरण गोलाईत याने सांगितले की, दि. ३० जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास दहिदी गावाचे वनजमिनीलगत असलेल्या शेतात निर्जनस्थळी एक महिला एकटीच काम करत असल्याचे त्याने पाहिले. तिच्या अंगावरचे दागिने पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले. परिसरात कोणीच नव्हते. निर्जन भाग, त्यात ती एकटी महिला, त्यामुळे ती विरोध करणार नाही याची त्याला खात्री पटली. तिला भीती दाखवून आपण लुटू शकतो हे त्याच्या लक्षात आले होते, त्यामुळे त्याने तिला पाणी पिण्याच्या बहाण्याने व मोरेवाडी गावाचा रस्ता विचारण्याचे बहाण्याने जवळ बोलावले. ती जवळ येताच त्याने तिच्यावर झडप घातली. तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने चोरण्याच्या बहाण्याने तिच्याशी झटापटी केली, पण तिने जोरदार विरोध केला. त्याला प्रतिकार करत ती बचावासाठी आरडाओरडा करू लागली. तिच्या आवाजाने लोक जमतील या भीतीने त्याने तिच्या अंगावरील साडीने तिचा गळा आवळला. तिचा श्वास कोंडला. ती तडफडत हात-पाय झाडू लागली, जीवाच्या आकांताने विरोध करू लागली, पण तिचे काही चालले नाही. काही क्षणात ती बेशुध्द होऊन पडली, तेंव्हा त्या नराधमाने फावड्याने वार करून तिला ठार मारले. त्यानंतर तिच्या गळ्यातील सोन्याची पोत व हातातील चांदीच्या पाटल्या काढून घेतल्या. पायातील वाळे निघत नव्हते म्हणून त्याने पाय फावड्याने तोडण्याचा प्रयत्न केला तरी पाय तुटले नाहीत म्हणून त्याने तिचा मृतदेह आपल्या मोटरसायकलवर टाकून सुमारे एक कि.मी. अंतरावरील वनजमिनीच्या नाल्यात घेवून गेला. तेथे तिचा मृतदेह टाकल्यावर तिच्या अंगावरील कपडे काढून घेतले ते काही अंतरावर असलेल्या पाण्याच्या डबक्यात टाकून दिले. त्यानंतर तो मोटरसायकलने करंजगव्हाण येथे गेला. तेथून एका दुकानातून कोयता खरेदी केला. तो कोयता घेवून परत त्या जंगलात आला. त्याने कोयत्याने वार करून तिचे दोन्ही पाय घोट्यापासून तोडून टाकले. त्यानंतर तिच्या पायातील चांदीचे वाळे काढून घेतले. अत्यंत क्रूरपणे हत्या करून पुरावा नष्ट करण्यासाठी त्याने तिचा मृतदेह व तोडलेला एक पाय त्याचठिकाणी दगड व मातीखाली गाडून टाकला तर दुसरा पाय झुडुपात फेकून दिला. केवळ चांदीच्या दागिन्यांसाठी तिची इतक्या क्रूरपणे हत्या केल्याचे ऐकून पोलिसांनाही धक्का बसला. त्याने कबुली दिल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. अधीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर अधीक्षक अनिकेत भारती, उपविभागीय अधिकारी पुष्कराज सुर्यवंशी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक मयुर भामरे, सहाय्यक उपनिरीक्षक रविंद्र वानखेडे, हवालदार जालिंदर खराटे, नवनाथ सानप, पोलीस शरद मोगल, दत्ता माळी, योगेश कोळी, बापू खांडेकर, तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, उपनिरीक्षक विशाल पाटील यांनी गुन्हा उघडकीस आणला, पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी या पथकाचे अभिनंदन करून २५ हजाराचे बक्षिस जाहीर केले.

## भांडणामुळे बेरोजगार प्रियकराचे ...

झाले. या इमारतीच्या एका खोली मधून दुर्गधी येत असल्याने पोलिसांनी ती खोली उघडून बघितली असता,घरातील बेड मध्ये ३७ वर्ष वयोगटातील एका महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत मिळून आला. वरिष्ठांच्या मार्गदर्शनखाली या गुन्ह्याच्या तपासाला प्रारंभ केला. पोलिसांनी मृतदेहाची पाहणी केली असता तिच्या शरीरावर मारहाणीच्या जखमा दिसत होत्या.तसेच तिचा गळा आवळून खून करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत होते.पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा करून तो शवविच्छेदनसाठी रवाना केला. पोलिसांनी इमारती मधील रहिवाशांकडे या घटने विषयी चौकशी केली असता, मृतक महिलेचे नाव मेघा शाह असल्याचे समोर आले .ती आपला पती हार्दिक शाह याच्या सोबत या ठिकाणी भाड्याने राहत होती. परंतु घटनास्थळहुन पती हार्दिक बेपत्ता झाल्याने पोलिसांना त्याचा संशय आला. पोलिसांची तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली. हत्येचा गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक पोलिसांबरोबर गुन्हे शाखा युनिट दोनचे पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कसून मेहनत घेत या गुन्ह्यातील संशयित आरोपी हार्दिक शहा या २७ वर्षीय तरुणाला राजस्थान मध्ये पळून जाण्याच्या तयारीत असताना ,गुन्हे शाखेच्या पथकाने जीआरपीच्या मदतीने मध्यप्रदेशच्या नागदा रेल्वे स्टेशन येथून १५ फेब्रुवारी रोजी चौकशीसाठी ताब्यात घेतले.

हार्दिक याला पोलीस ठाण्यात आणून त्याची कसून चौकशी केली असता, या वेगळी माहिती पुढे आली. ती एकूण पोलिस ही चक्रावून गेले. मेघा शाह आणि हार्दिक शहा हे दोघे पतिपत्नी नसून ते नालासोपारा येथील विजयनगर परिसरातील 'सीता सदन' या इमारतीमध्ये लिव्ह-इन रिलेशिपमध्ये राहत होते. मेघा शाह हिचे खरे नाव मेघा धनसिंग तोरवी असे होते. ती मूळची राजस्थानची होती. ती मुंबईत परिचारिका म्हणून काम करीत होती. तर हार्दिक शहा राजस्थानमधील एक प्रतिष्ठित आणि धनाढ्य तरुणाचा मुलगा होता. या दोघांचे प्रेम प्रकरण सुरू असल्याने ते लिव्ह-इन रिलेशिप मध्ये राहत होते.मात्र बाहेरील दुनियेला आपण पती पत्नी असल्याचं सांगत होते. हार्दिक हा बेरोजगार होता.त्याला कुठला कामधंदा नव्हता. त्यामुळे दोघांमध्ये पैशांवरून नेहमी वाद होऊन भांडण होतं असायचे. रोजच्या भांडणाला पती कंटाळला होता. त्यामुळे तो वैतागून गेला होता. शेवटी ११ फेब्रुवारी रोजी पैशांवरून या दोघांत कडाक्याचे भांडणे झालीत. भांडणच्या नांदत हार्दिक याने मेघाचा टॉव्हेलने गळा आवळून तिची हत्या केली. त्यानंतर तिचा मृतदेह बेडमध्ये टाकून तो घटनास्थळहुन पसार झाला. तत्पूर्वी त्याने घरातील सर्व फर्निचर ४५०० हजाराला विकून टाकले होते. फक्त ज्या बेड मध्ये मेघाचा मृतदेह लपवला होता. तो बेड तसाच होता. परंतु मृतदेह तीन चार दिवस बेड मध्ये असल्याने तो कुजला व त्याचा वास येऊ लागला.त्यामुळे इमारती मध्ये दुर्गधी पसरली. मेघाची हत्या करून तो तुलिज पोलीस ठाणे परिसरात बराच वेळ फिरत होता, त्यानंतर मात्र तो राजस्थान जाणारी गाडी पकडून पळून गेला.मात्र पोलिसांनी त्याला बरोबर गाठून नागदा मधून अटक केली.

# जिल्ह्यात शाश्वत स्वच्छता ठेवणे हीच संत गाडगेबाबांना आदरांजली-संदिप कोहिणकर

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत वैयक्तिक, सार्वजनिक शौचालय, पाणी गुणवत्ता, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या कामामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी शाश्वत काम करणे हीच संत गाडगेबाबा यांना अभिवादन ठरेल अशी अपेक्षा सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी व्यक्त केली. सोलापूर जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षने संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिणकर हे बोलत होते. ते म्हणाले की, जलसुरक्षक दैनंदिनीमधील माहिती अद्ययावत ठेवून सर्व जलसुरक्षक यांनी गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता चांगली ठेवण्यासाठी प्रयत्नशिल रहावे असे आवाहनही मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं./पा.व स्व.), इशाधीन शेळकंदे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल कल्याण) जावेद शेख, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुनिल कटकधोंड, बांधकामचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी




अभियंता नरेंद्र खराडे , जिल्हा कृषी विकास अधिकारी विवेक कुंभार, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी उत्तम सुर्वे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, संत गाडगेबाबा महाराज यांच्या वेशभूषेतील फुलचंद नागटिळक आदी उपस्थित होते. संत गाडगे बाबा यांचे स्वच्छता विषयक कार्य अलौकिक आहे. असे सांगून सिईओ संदीप कोहिणकर यांनी व्यक्त केले. सोलापूर जिल्हसात स्वच्छतेचे सातत्य टिकविणे साठी सार्वत्रिक जबाबदारी आहे. ओडिएफ प्लस बरोबर इतर सर्व बाबी मध्ये स्वच्छतेचे सातत्य टिकवून ठेवले आहे. मग ते सार्वजनिक शौचालय असो कि वैयक्तीक शौचालय असो. संस्थात्मक स्वच्छतेचे सातत्य देखील टिकवून ठेवले पाहिजे, असेही सिईओ संदीप कोहिणकर यांनी सांगितले. प्रारंभी उप मुख्यकार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे म्हणाले, संत गाडगे बाबा हे केवळ स्वच्छतेपुरते सिमित नाहीत तर त्यांनी अंधश्रद्धा निर्मुलन असे कि बाबांचे दशसुत्री ची प्रभावी अंमलबजावणी शासन करीत आहे. असेही उप मुख्यकार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांनी सांगितले. यावेळी जलसुरक्षक दैनंदिनी २०२३ तसेच जल जीवन मिशन व क्षेत्रीय पाणी गुणवत्ता तपासणी संच (एफटीके) विषयी पोस्टरचे प्रकाशनही करण्यात आले.तसेच यावेळी जिल्ह्यातील जलसुरक्षक यांचे प्रतिनिधी म्हणून खेड ग्रामपंचायतीचे जलसुरक्षक संतोष दरेकर, करकंब गावात शाश्वत स्वच्छ ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबविणारे स्वच्छतादूत, ज्ञानेश्वर नारायण दुधाणे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाफळकरवस्ती बार्डी केंद्र पांढरे वाडी, तसेच रमेश खारे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जळोली केंद्र उंबरे यांचे टीमचा गौरव करणेत आला. तसेच अंमलबजावणी सहाय्य संस्थेचे समाजशास्त्रज्ञ आनंद मोची, स्वच्छ व सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम राबविणाऱ्या मुख्याध्यापत दत्तात्रय बेदरे व सहशिक्षक विष्णू आसबे या शिक्षकांचा तसेच संत गाडगेबाबा महाराज यांच्या वेशभूषेतील फुलचंद नागटिळक यांचा स्वच्छतेविषयी जनजागृतीच्या योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. जिल्ह्यातील सर्व जलसुरक्षक यांनी ग्रामस्थांना शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी जलसुरक्षक दैनंदिनीच्या माध्यमातून दक्षता घ्यावी असे सांगितले तसेच यावेळी कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी व जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी आपल्या भाषणामध्ये संत गाडगेबाबा यांच्या अस्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन आदी कार्याचा गौरव करुन आज प्रत्येकांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लेखा अधिकारी श्रीकांत मिरगाळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी सचिन सोनकांबळे, संवाद तज्ञ सचिन सोनवणे, क्षमता बांधणी तज्ञ महादेव शिंदे, स्वच्छता तज्ञ प्रशांत दबडे, पाणी गुणवत्ता तज्ञ दिपाली व्हटे, मनुष्यबळ विकास तज्ञ शंकर बंडगर, अभियांत्रिकी तज्ञ मुकूंद आकुडे, सनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ यशवंती धत्तुरे, प्रतिक्षा गोडसे, अर्चना कणकी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महादेव शिंदे यांनी केले तर आभार सचिन सोनवणे यांनी मानले.

# देवणी तालुक्यात सरसकट पिकविमा द्या

## शेतकऱ्यांचे तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी व तालुक्यात खरीप हंगामातील सर्व पिकांचे अतिवृष्टी, संततधार, गोगलगाय, व पावसात खंड आदी संकटाने संपुर्णता नुकसान झालेले आहे. तालुक्यात सरसकट पिकविमा द्यावा या प्रमुख मागणीचे निवेदन शेतकऱ्यांच्या वतीने गुरुवार दि.२३ फेब्रुवारी रोजी देवणी तहसीलदार मार्फत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले. उडीद, मुग, ज्वारी, सोयाबीन, तुर आदीसह विवीध पिकांचे तसेच फळबाग व फूलशेतीचे या संकटाने माती केली आहे. यामुळे शेतकर्याचे आर्थीक कंबरडे मोडले आहे. यावेळी मदतीची गरज असताना विमा कंपनीकडून शेतकर्याचा छळ केला जात आहे. मा.महाराष्ट्र शासनाने सरसकट आर्थिक मदत अनुदान स्वरूपात शेतकर्यांना दिली आहे. याच धर्तीवर तालुक्यातील शेतकऱ्यांना पिकविमा सरसकट देण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी नायब तहसीलदार सविता माडजे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आनंद जिवणे, मनोज पाटील, श्रीमंत लुल्ले, योगेश तगरखेडे, नरसिंग नागराळे, विश्वंभर पाटील, ज्ञानोबा पांडे, मालबा घोणसे, रामचंद्र गौंडगावे, मचकुरी बडेसाब, गणपत वाघमारे, निळकंठ बिरादार, शिवराज बिरादार, नागनाथ स्वामी, सुधाकर पाटील, शिवदास पाटील, शंकर पाटील, सन्मुख स्वामी याच्यासह आदी तालुक्यातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागतिर्थवाडी येथे केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील नागतिर्थवाडी येथे तळेगाव भोगेश्वर केंद्रा अंतर्गत सर्व जिल्हा परिषद शिक्षकांसाठी केंद्र स्तरीय शिक्षण परिषद बुधवार दि.२२ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद शाळा नागतिर्थवाडी व जिल्हा परिषद शाळा ममदापूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली. या शिक्षण परिषद दरम्यान तळेगाव भोगेश्वर केंद्र अंतर्गत सर्व शाळेतील कामकाजाचा आढावा, विद्यार्थी अध्ययन निष्पत्ती व विद्यार्थ्याची गुणवत्ता आणि शाळेत राबविण्यात येणारे नावीन्यपूर्ण उपक्रम या सर्व विषयावर आधारित कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर कोंबडेहे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच राज गुणाले, ग्रामसेवक श्यामसुंदर क्षीरसागर, देवणी तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी व्यंकटराव बोईनवाड, तळेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख ज्ञानोबा कार्ले, केंद्रीय मुख्याध्यापक शिवाजी भंडे, साधनव्यक्ती विष्णुदास मोरे, पांडूरंग वाघमारे यांच्या सह केंद्रातील सर्व जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन महादेव हलगरे मुख्याध्यापक ममदापुर यांनी केले, तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी अश्विनीकुमार गुंजरगे मुख्याध्यापक नागतिर्थवाडी, सहशिक्षिका शारदा गुंगे, सहशिक्षिका सुचिता मोटाडे यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचा समारोप निसर्गरम्य वातावरणात भज्जी, भाकरी, आंबील, खिचडा अशा वेळ आमवशेच्या जेवणाने करण्यात आला.

# देवणी तालुक्यातील देव नदीवर रबर डॅम प्रकल्प उभारणीसाठी सर्वेक्षण; आमदार संभाजी पाटील निलंगेकरांचा पाठपुरावा!



**लातूर/प्रतिनिधी**

निलंगा विधानसभा मतदारसंघाअंतर्गत असलेल्या देवणी तालुक्यात सिंचनाच्या सोयी सुविधा वाढाव्यात आणि त्या माध्यमातून सिंचन क्षेत्र वाढवून त्याचा लाभ शेतकऱ्यांसह नागरीकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी व्हावा याकरीता माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी देवणी तालुक्यातील वागदरी येथे देव नदीवर रबर डॅम प्रकल्प उभारणीची मागणी केली आहे. या प्रकल्पासाठी जलसंपदा विभागाच्या वतीने सर्वेक्षण करण्यात आलेले असून पंधरा दिवसात याबाबत प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल अशी माहिती जलसंपदा विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. नागपूर पासून जवळच असलेल्या शिरोरा येथे रबर डॅम प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. हा प्रकल्प उभारण्यासाठी कमी खर्च व कालावधी कमी लागून त्याचा फायदा शेतकऱ्यांसह नागरीकांना मोठ्या प्रमाणात होत आहे. याच धर्तीवरच मराठवाड्यासाठी पथदर्शी व दिशादर्शक ठरेल असा रबर डॅम प्रकल्प निलंगा विधानसभा मतदारसंघाअंतर्गत देवणी तालुक्यातील वागदरी येथे देव नदीवर उभारण्यात यावा अशी मागणी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली आहे. सदर प्रकल्प उभारल्यास देवणी तालुक्यात सिंचनाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढून त्याचा लाभ शेतकऱ्यांसह नागरीकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी होणार आहे. विशेष म्हणजे हा प्रकल्प उभारण्यासाठी कमी खर्च व कालावधी कमी लागत असल्याने त्याची उभारणी लवकरात लवकर होऊ शकते. या प्रकल्पाकरीता माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी शासन स्तरावर पाठपुरावा सुरु केलेला असून त्यासाठी आवश्यक असणाऱ्या मंजूरी व निधीही लवकरच उपलब्ध होणार आहे. त्या अनुषंगानेच लातूर जलसंपदा विभागाच्या वतीने सदर प्रकल्प अहवाल सादर करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. हा अहवाल तयार करण्यासाठी मुंबई येथील योइल इन्फ्रा यांना सांगण्यात आलेले आहे. या कंपनीचे अजय ठाकरे, मंगेश खांडेश्वर, संपत पाटील यांच्यासह जलसंपदा विभागाचे अधिकारी यांनी वागदरी येथे पाहणी दौरा करून प्रकल्प उभारणीसाठी सर्वेक्षण केलेले आहे. त्यानुसार सर्वबाबीची पुर्तता करून पंधरा दिवसाच्या आता या प्रकल्पाचा अहवाल जलसंपदा विभागास सादर करण्यात येईल असे ठाकरे यांनी सांगितलेले आहे. विशेष म्हणजे या कंपनीच्या माध्यमातूनच महाराष्ट्रातील पहिला रबर डॅम प्रकल्प शिरोरा येथे उभारण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प उभारण्यासाठी कमी कालावधी व खर्च लागतो आणि आगामी काळात याच्या देखभालीसाठी सुद्धा कमी खर्च लागत असल्यामुळे याप्रकारचे रबर डॅम प्रकल्प निश्चितच मराठवाड्यासाठी पथदर्शी व दिशादर्शक ठरतील असा विश्वास व्यक्त करण्यात आलेला आहे. माजी मंत्री आ. निलंगेकर यांच्या दुरदृष्टीतून आणि पाठपुराव्यातून मराठवाड्यात प्रथमच रबर डॅम प्रकल्प देवणी तालुक्यात उभारला जात असल्याने देवणी तालुक्यातील शेतकऱ्यांसह नागरीकांनी आनंद व्यक्त करून माजी मंत्री आ. निलंगेकर यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# पत्रकार किसन जाधव यांच्यावर हल्ला



**मुंबई/प्रतिनिधी**

सध्या मुंबईतील गुन्हेगारी प्रचंड वाढली आहे. गुइन्हेगार एवढे निर्ढावले आहेत कि लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांवरही हल्ले कारण्याकरयला त्यांनी सुरुवात केली आहे. फेरीवाल्यांच्या विरोधात बातमी छापली म्हणून मुंबई जनसत्ताचे संपादक आणि मुंबईचे जेष्ठ पत्रकार किसान जाधव यांच्यावर तीन फेरीवाल्यांनि हल्ला केला. मात्र या प्रकरणी नागपाडा पोलिसांनी सुरुवातीला फिर्याद नोंदवून घ्यायला नकार दिला आणि नंतर साधी ऐंशी नोंदवून घेतली आणि तीही क्रॉस एनसी. त्यामुळे संतापलेल्या जाधव यांनी या प्रकरणी राज्याचे उपमुख्यमंत्री ,पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त उपयुक्त यांच्याकडे रीतसर लेखी तक्रार नोंदवली आहे. मुंबईच्या ग्रांट रॉड स्थानका नजीकच्या बेकायदेशीर आणि प्रवाशांना अडथळे ठरणाऱ्या फेरीवाल्यांच्या विरुद्ध मुंबई जनसत्ता मध्ये बातमी छापली होती या बातमीत अतिक्रमण विभागाचे प्रमुख तानाजी मोरे यांच्यावरही संशय व्यक्त केला होता त्यानंतर २१ फेब्रुवारी रोजी जाधव हे मुंबई सेंट्रल वरून आपल्या दुचाकीने नागपाड्याला येत असताना वाटेतच तीन अनोळखी गुंडानी त्यांना गाठले आणि त्यांना हमारे खिलफा क्यू लिखते हो असे म्हणत शिवीगाळ केली आणि मारहाण केली तसेच आज कूच लाखोज तो जन्स मर देंगे अशी धमकी दिली या प्रकरणी किसान जाधव यांनी नागपाडा पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद नोंदवण्याचा प्रयत्न केला पण सुरुवातीला त्यांची फिर्याद घेतलीच नाही पण नंतर मात्र साधी एनसी घेतली त्यानंतर आरोपी कलिफ सलीम अन्सारी याला बोलावून किसान जाधव आणि अन्सारी या दोघांमध्ये वाद झाल्याची क्रोस एनसी घेतली ज्या आरोपीला जाधव ओळखताच नव्हते त्याच्याशी त्यांनी वाद घालण्याचा प्रश्नक्सह नव्हता उलट त्याने आपल्या दोन साथीदारांसह जाधव यांच्यावर हल्ला केल्याने कुरेशी यांच्यासह त्याच्या दोन साथीदारांवर पोलिसांनी एफआयआर दाखल करवून त्यांना ताब्यात घ्यायला हवे होते पण तसे न करता पोलिसांनी त्याच्या २ साथीदारांना सोडून दिले पोलिसांची हि कृती संशयास्पद आहे. असा आरोप किसान जाधव यांनी केला आहे पत्रकार जाधव यांच्यावरील हल्ल्यानंतर पुन्हा एकदा पत्रकारांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

पान ८ वरून....

## वाळूमाफीयांशी साटेलोटे शासनाची...

विषेश म्हणजे या पंचनाम्यात पंच म्हणून संबंधित शेतकरी व ज्यांनी वाळू चोरून साठवली होती अशा त्या तीन वाळू माफियांचीच (पंच) म्हणून नावे नोंद केली आहेत. तसेच या वाळूचा जाहीर रित्या लिलाव करून पंचनाम्यात जे पंच म्हणून वाळू माफिया होते त्यांनाच वाळू कमी दराने विक्री करण्यात आली आहे. यामागे संबंधित वाळूमाफिया आणि पाथरी च्या तहसिलदार सुमन मोरे व महसुल सहाय्यक किरण लांडगे यांनी शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून आपल्या घशात घातला आहे. तसेच या वाळू प्रकरणातील दिनांक २४ जानेवारी २०२३ रोजी मंडळ अधिकाऱ्याने दाखल केलेला अहवाल तसेच १ फेब्रुवारी रोजी चे १२:३० ते ०३:३० या वेळेतील आवक-जावक चेंबर व तहसिलदार सुमन मोरे यांच्या चेंबर मधील सी.सी.टी.व्ही फुटेज ची लेखी अर्ज देऊन मागणी केली असता, रितसर मागणी चे दस्तावेज न देता उडवा-उडवी ची उत्तरे देण्यात आली आहेत. एवढेच नाही तर अर्जदार उजगरे यांना देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये ही खाडाखोड करण्यात आली आहे. यावरून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार या दोघांनी केल्याचे दिसून येत आहे. तसेच रुजू झाल्यापासून आज पर्यत आणखीन किती भ्रष्टाचार केला असेल याचीही चौकशी करण्यात यावी तसेच वरील प्रकरणी तहसीलदार सुमन मोरे व महसुल सहाय्यक किरण लांडगे याच्यावर कडक कारवाई करून दोघांचे ही निलंबन करावे अशी मागणी लक्ष्मण उजगरे यांनी परभणीच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल यांना दिनांक १३ फेब्रुवारी रोजी केली होती. त्यानंतर दिनांक १६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांना चौकशीचे आदेश दिले आहेत. सद्या तरी उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांची २३ तारखेपर्यत रजा असल्याची माहीती आहे लाहोटी यांची रजा संपल्यानंतर ते काय कारवाई करतात याची उत्सुकता पाथरी वासियांनी आहे.

## संत गाडगेबाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून...

कीर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या मनातील घाण साफ करणारे संत गाडगे महाराज म्हणजे एक अद्वितीय असे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या विचार, आचार आणि कार्याचा वारसा आपण प्रत्येकांनी पुढे चालवला पाहिजे. असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मारुती माळी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. सागर ठाकूर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीशैल्य पाटील, लांडगे, यशपाल डोरमारे, योगीराज माकणे, राम पाटील, संदीप मोरे आदींनी परिश्रम घेतले.

## भोले की बारात काढून महाशिवरात्री ...

अक्षरशः भुरळ पाडली. बारातीचा सुखसोहळा लातूरच्या भाविक भक्तांनी आपल्या डोळ्यात साठवून ठेवण्यास प्रचंड गर्दी केली होती. शहरातील पापविनाश रोड, सेंट्रल हनुमान, औसा हनुमान, गांधी चौक, हनुमान चौक, गंज गोलाई, भुसार लाईन, सुभाष चौक खडक हनुमान मार्गे ही बारात पापविनाश मंदिरात पोहचली. या आगळ्यावेगळ्या बारातीने संपूर्ण लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले. भोले की बारात आपल्याला पाहायला मिळाली,हे आपले अहोभाग्य असल्याच्या प्रतिक्रिया लातुरातील अनेक शिवभक्तांनी व्यक्त केल्या. या संपूर्ण उत्सवाच्या यशस्वीतेसाठी महाकाल प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच सर्व शिवभक्तांनी परिश्रम घेतले.

## पोलिस अधीक्षक डॉ. सोमय मुंडेंचा...

पंढरी म्हणून ओळखली जाते. याच लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रातील आगळा-वेगळा 'पॅटर्न' सबंध राज्यभरात नावलौकिक आहे. त्यामुळे राज्यभरातून विद्याथीर व पालकांचा लोंढा लातुरात येतो. या विद्यार्थ्यांच्या सुरक्षीततेसाठी लातुरात पहिल्यांदाच पोलिस अधीक्षक डॉ. मुंडे यांनी संबंधित यंत्रणांची बैठक बोलावली होती. या बैठकीत संबंधितांच्या अडचणी समजून घेऊन तसेच पोलिसांकडून राबविण्यात येत असलेल्या यंत्रणांची माहिती देत पोलिस अधीक्षक डॉ. मुंडे यांनी संबंधित यंत्रणांना सूचना करीत विद्याथीर व यातील निगडीत सर्वांच्या सुरक्षीततेसाठी पोलिस यंत्रणा सक्षम असल्याचे आश्र्वासन दिले. सूत्रसंचालन सुरवसे यांनी केले तर आभार सहाय्यक पोलिस निरीक्षक शहाणे यांनी मानले.

## स्वच्छ, सुंदर, हरित जळगावासाठी...

उपक्रम राबविणे. ज्या भागात स्वच्छता अभियान राबविण्याची गरज आहे, असे भाग शोधून त्या भागातील नागरिकांना प्रोत्साहनाच्या दृष्टीने एकत्रिकरण करणे असे प्रस्ताव ठेवण्यात आले. यावर साधक बाधक चर्चा होऊन सकारात्मकेतसह स्वच्छ जळगाव, सुंदर जळगाव, हरित जळगाव करण्यावर रूपरेषा ठरविण्यात आली. गांधी रिसर्च फाऊंडेशन विधायक काम करित असताना समन्वयकाच्या भूमिकेत राहिल. वृक्षारोपणासह संवर्धन करत असतानाच स्वच्छतेच्या दृष्टीने जळगावात आज स्थिती काय आहे. समस्या कुठे आहेत, त्यावर उपाय करण्यासाठी काय केले पाहिजे याचा विचार झाला पाहिजे जेणे करून समस्येवर योग्य तोडगा काढता येईल. त्यादृष्टीने शाळा महाविद्यालयांपासून सामाजिक संस्था, व्यक्तींनी काम केले पाहिजे. आपला परिसर स्वच्छ करत असतानाच कचऱ्याचे योग्य विल्हेवाट लावावी. कुठेलेही अभियान राबविताना आरोग्याच्या दृष्टीने सजग राहिले पाहिजे. त्याबाबत जागरूकता करावी आपला वेळ देत असताना नागरिकांचा वेळ कसा विधायक कामांमध्ये लागेल यासाठी प्रयत्न करावे. विधायक कामातून प्रशासनावर चांगले काम करण्यासाठी दबाव आणला पाहिजे असे मार्गदर्शन डॉ. सुदर्शन अय्यंगार यांनी केले. समाज व प्रशासन एकत्र येणार नाही तोपर्यत जळगाव सुंदर होणार नाही यासाठी सर्वानी प्रयत्न करावे. स्वच्छता कर्मचाऱ्यांनी ओला सुका कचरा वेगळा असेल तरच घ्यावा. सेवा नाही तर आपण स्वच्छतेची सवय लावू, कचऱ्याला कचरा म्हणून बघितले नाही तोपर्यत स्वच्छता मोहिम यशस्वी होणार नाही. स्वच्छ वर्ग ही संकल्पना राबविण्याबाबतच्या सुचना उपस्थितांनी केल्या. यावेळी बैठकीत प्रामुख्याने गांधी रिसर्च फाऊंडेशनचे डॉ. अश्विन झाला, गिरीष कुळकर्णी, सुधीर पाटील, निवृत्त वनाधिकारी पी. आर. पाटील, आय.एस.रितापूरे, एनसीसीचे गोविंद पवार, डॉ. महेंद्र काबरा, वसीम पटेल, दुर्गादास मोरे, राजेंद्र खोरखेडे, मुकेश कुरील, जैन इरिगेशनचे देवेंद्र पाटील, मदन लाठी यासह शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी व सामाजीक कार्यकर्ते आदी उपस्थीत होते. प्रास्ताविक व संचालन गिरीष कुळकर्णी यांनी तर आभार हेमंत बेलसरे यांनी मानले.

## संपकरी अंगणवाडी सेविकांचा शहापूर ...

मानधनाएवढी पेन्शन, ग्रॅच्युईटी, सुसज्ज अंगणवाडी केंद्र, पूरक पोषण आहाराच्या दरात वाढ, कार्यक्षम मोबाईल व मराठी पोषण ट्रैकर अप, सेवानिवृत्ती लाभ, इतर भत्ते, केंद्राचे भाडे, परिवर्तन निधी थकित रक्कमा देणे या प्रमुख मागण्या असून त्यासाठी अंगणवाडी सेविका लढा देत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाचे सरचिटणीस ब्रिजपाल सिंह यांनी दिली आहे.

# दुचाकीच्या अपघातात एकाचा मृत्यू; दोघे जखमी



वाडा : वाडा तालुक्यातील देवळी-आपटी येथे झालेल्या अपघातात दुचाकी चालकाचा दुःखद निधन झाले आहे तर मागे बसलेले दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून वाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले आहे. तर एकाचा मृतदेह शवागृहात ठेवण्यात आला आहे. यातील विस्वास सदु वाघ (वय १५) व सुरज वाघ (वय १८) राहणार आपटी यांच्या पायला गंभीर दुखपत झाली आहे हे दोघे बिलोशी येथे विट भट्टीवर काम करतात तर प्रभाकर बरफ (वय१९) राहणार आपटी हा खाजगी कंपनी काम करत होता. प्रभाकर बरफ याच्या शाईन या गाडीवर तिघे जन बिलोशी येथे जात असताना अपघात झाला मात्र अपघाताचे कारण समजू शकले नाही. अगदी तरुण वयात अपघाती निधन झाल्याने आपटी व पारिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## चिन्ह नव्हे विचार महत्वाचा आहे...

प्रमूख भागवत वंगे, देवणी तालूका प्रमुख मुकेश सुडे, शहर प्रमुख दिपक स्वामी, उपजिल्हा प्रमुख विनोद आर्य विष्णू साबदे, युवा सेना अमोल भोसले ऊपतालूका प्रमुख लक्ष्मण बिरादार, संजय बिरादार,बालाजी बिरादार, पंडित भंडारे, लाला पालेकर, वलांडी शाखा प्रमुख, राजकुमार कार्ले, गोविंद कार्ले, लहू सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती, प्रास्ताविक डॉ.शोभाताई बेंजरगे तर आभार बाबूराव शेळके यांनी मानले.

27 FEB TO 05 MARCH 2023 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 2/25/2023 7:39 PM Page 1



# वाळूमाफीयांशी साटेलोटे शासनाची फसवणूक; पाथरी तहसीलदारांच्या चौकशीचे जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आदेश




**पाथरी/लक्ष्मण उजगरे**

पाथरी तालुक्यातील गौंडगाव नदी किनारी वाळु माफियांनी साठवलेली ८०० ते ९०० ब्रास वाळू, संबंधित मंडळ अधिकाऱ्याने दिनांक २४ जानेवारी रोजी ही वाळू जप्त करून ५०० ब्रास वाळू जप्त केली असल्याचा अहवाल तहसील कार्यालयात सादर केला होता व त्याची कार्यालयाच्या आवक नोंद वहीत आवक अनुक्रमांक ७०२८ वर नोंद ही केली होती, परंतु तहसीलदार सुमन मोरे व महसुल सहाय्यक किरण लांडगे यांनी आवक नोंद वहीत खाडाखोड करून ती वाळू ५० ब्रास असल्याचे दाखवून शासनाची फसवणूक केली आहे. अशी तक्रार लक्ष्मण उजगरे यांनी पुराव्यासह जिल्हाधिकारी आँचल गोयल यांच्याकडे केली होती. जिल्हाधिकारी आँचल गोयल यांनी प्रकरणाची दखल घेत तात्काळ चौकशी चे आदेश दिले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, परभणी जिल्हाधिकारी तसेच पाथरीचे उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात लक्ष्मण उजगरे यांनी म्हटले आहे की गौंडगाव येथे नदीपात्रातून उपसा केलेली ८०० ते ९०० ब्रास पेक्षा जास्त वाळूची माफीयाने साठवणूक केली होती. या वाळूची विल्हेवाट लावताना वाळूमाफिया आणि पाथरी तहसीलदार सुमन मोरे व महसुल सहाय्यक किरण लांडगे यांनी संबंधित मंडळ अधिकाऱ्याने ५०० ब्रास वाळू जप्त करून दाखल केलेला अहवाल गहाळ करून केवळ ५० ब्रास वाळू आहे असे दाखवत आवक नोंदवहीतील अनुक्रमांक ७०२८ वरील नोंदी तील ५०० ब्रास वाळू जप्त च्या ठिकाणी खाडाखोड करत शुन्य (0) कट करून केवळ ५० ब्रास वाळू जप्त असे आवक नोंद वहीत दर्शविले आहे व ५० ब्रास वाळूचा बनावट (खोटा) पंचनामा तयार केला आणि ...पान ७ वर

## संत गाडगेबाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून लोक प्रबोधनाची चळवळ चालवली -डॉ.दिनेश मौने



**लातूर/प्रतिनिधी**

संत गाडगे महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून लोकप्रबोधनाची चळवळ आधुनिक काळात महाराष्ट्रभर चालवली असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश मौने यांनी केले ते संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात बोलत होते. यावेळी डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा.डॉ.संतोष शेटे, प्रा. मारुती माळी, प्रा. सागर ठाकूर, नामदेव बेंदरगे, विनायक लोमटे, वीरशेन उटगे, योगेश मोदी, रत्नेश्वर स्वामी, श्रीमती शेटे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना प्राचार्य डॉ.दिनेश मौने म्हणाले की, संत गाडगे महाराज हे माणसात देव शोधणारे संत होते. स्वतः अशिक्षित असले तरी त्यांनी आयुष्यभर शिक्षणाचा ध्यास घेतला. मुलाबाळांना शिकवा. पैसे कमी पडले तर सोने विका. गरज पडली तर घरातील भांडीकुंडी विका. वेळच आली तर फाटके कपडे घाला. पण पोराबाळांना शिकवा. हा संदेश आयुष्यभर त्यांनी दिला. हातातल्या खराट्याने दिवसभर गावातील घाण साफ करणारे आणि रात्री ...पान ७ वर

## 'बालस्नेही गाव निर्माण करण्यासाठी फत्तेपुरकरांनी पुढाकार घ्या'




**औसा/शिवाजी मोर**

श्रीमती लक्ष्मीबाई ढेंकरे माध्यम विद्यालय फतेपुर या विद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रामध्ये चांगली कामगिरी केली असून वर्ग खोल्यांना महामानवाचे नावे देऊन ज्ञानवर्धनाचे कार्य चांगल्या पद्धतीने होतअसल्याचे पाहून समाधान वाटते. फत्तेपूर गावाला येणाऱ्या काळामध्ये बाल स्नेही गाव निर्माण करण्यासाठी संस्थेचे संचालक मंडळ शिक्षक गावातील सरपंच शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी सर्वतोपरी प्रयत्न करावेत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आपणास लागणारे सहकार्य आम्ही निश्चित देऊ असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी केले. फत्तेपूर येथील श्रीमती लक्ष्मीबाई ढेंकर विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व्यंकटराव पाटील हे होते प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे बाल विकास प्रकल्प अधिकारी किशोर गोरे मारुती महाराज कारखान्याचे संचालक शामराव पाटील संस्थेचे अध्यक्ष ॲड. बाबुराव मोरे संचालक दयानंद चव्हाण सरपंच अनिता माळी सोसायटीचे चेअरमन ज्योतीराम साळुंखे व संस्थेचे सचिव प्रा. दत्तात्रय सुरवसे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी गोयल म्हणाले की आपल्या शाळेचे विद्यार्थी हे उद्याचे देशाचे आदर्श नागरिक घडतील या विद्यार्थ्यांच्या माध्यमातूनच विविध क्षेत्रांमध्ये संस्थेचा व गावाचा नावलौकिक निश्चित करतील असे सांगून इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी व पुढील शैक्षणिक कार्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव दत्तात्रेय सुरवसे यांनी करून संस्थेची माहिती दिली सन २०२२ २३ या शैक्षणिक वर्षाच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर तसेच देवी देवतांचे गीते आणि लोकगीताच्या तालावर उत्कृष्ट नृत्य आविष्कार करून प्रेक्षकांची मने जिंकली वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक अनिल मुळे यांच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी प्रयत्नशील होते.

## स्वच्छ, सुंदर, हरित जळगावासाठी सज्जनशक्तीचा दृढ संकल्प

### गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या उपक्रमाला शैक्षणिक व स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवकांचा प्रतिसाद



**जळगाव/प्रतिनिधी**

स्वच्छता दूत, आठवड्यातून किमान एक तास स्वच्छतेसाठी, आपल्या परिसरातील विधायक काम करण्याऱ्या पाच व्यक्तींचे जनजागृतीसाठी एकत्रीकरण, स्वच्छता अभियान राबविणे, परिसरातील नागरिकांचे प्रबोधन, यातून जळगाव शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित करण्यासाठी सर्वसमावेशक विचार करण्याचा दृढ संकल्प आज जळगावातील सज्जनशक्तीने केला. महात्मा गांधीजीप्रमाणेच स्वच्छतेचा प्रचार प्रसार करणाऱ्या कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या १४६व्या जयंतीनिमित्ताने गांधी रिसर्च फाऊंडेशनने आयोजित केलेल्या स्वच्छ जळगाव... सुंदर जळगाव... हरित जळगाव संकल्पना साकार करण्यासाठीची प्राथमिकस्तरावरील बैठक गांधीतीर्थ येथे आज संपन्न झाली. याप्रसंगी विविध शाळा, महाविद्यालयांमधील स्काऊट, एनएसएस, एनसीसी तसेच सामाजिक संस्था व सामाजिक कार्यात सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती व संस्थांचे प्रतिनिधी अशा ६० च्यावर स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदवला. गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संचालक तथा गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुदर्शन अय्यंगार यांची प्रमुख मार्गदर्शन केले. शहराच्या विकासात, सौंदर्यीकरणात नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा ठरतो या दृष्टीने गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे प्रस्ताव मांडण्यात आले. यात प्रत्येकाने स्वच्छता दूत या भूमिकेतून किमान एक वर्ष जोडावे, आठवड्यातील किमान एक तास स्वच्छता विषयासाठी द्यावा. आपल्या परिसरातील किमान पाच व्यक्तींचा एक समूह तयार करून पुढील तीन महिन्यात घरापर्यंत स्वच्छतेविषयी प्रबोधन करावे. नगरसेवकांच्या माध्यमातून स्वच्छता कर्मचारी यांचेकडून स्वच्छता करून घ्यावी. परिसरातील प्लास्टिक कचरा एकत्रित गोळा करण्यासाठी एक दिवस ...पान ७ वर

## भोले की बारात काढून महाशिवरात्री उत्सव साजरा




**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहरात महाकाल प्रतिष्ठानच्या वतीने भगवान महादेव-पार्वतीचा विवाह सोहळा अर्थात 'भोले की बारात' काढून अत्यंत धार्मिक आणि सांस्कृतिक स्वरूपात आगळ्या वेगळ्या पध्दतीने महाशिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यात आला. महाशिवरात्रीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून पापविनाश मंदिरापासून सर्व भाविक भक्तांचे लक्ष वेधून घेणाऱ्या भोले की बारात ची सुरुवात झाली. यामध्ये महादेव-पार्वतीसह भगवान विष्णू-लक्ष्मी, ब्रम्हदेव-सरस्वती, चंद्रदेव-सूर्यदेव, नारदमुनी यासह अनेक साधू संत, अघोरी, भूत-पिशाच्च यांच्या वेषभूषेसह भाविक भक्त या बारातीमध्ये सहभागी झाले होते. या बारातीमध्ये 'भोले की फौज-करेगी मौज', हर हर महादेव, ओम नमः शिवाय चा जयघोष आसमंत दणाणून टाकत होता. या बारातीमध्ये सामील करण्यात आलेली नंदी व महादेव- पार्वतीची भव्य मूर्ती गुजरातनंतर महाराष्ट्रात लातूरमध्ये प्रथमच शोभायात्रेत आणली गेली. या मूर्तीच्या सौंदर्याने लातूरकरांना ...पान ७ वर

## पोलिस अधीक्षक डॉ. सोमय मुंडेंचा 'राजमाता जिजामाता'कडून सत्कार



**लातूर/प्रतिनिधी**

येथील अष्टविनायक प्रतिष्ठानच्या गणेश हॉलमध्ये गुरुवारी शिकवणी चालक, वसतिगृह संचालक व संबंधित यंत्रणांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पोलिस अधीक्षक डॉ. सोमय मुंडे यांचा शाल, पुष्पहार घालून राजमाता जिजामाता शैक्षणिक संकूल व अन्वी गर्ल्स हॉस्टेलचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांनी सत्कार केला. या प्रसंगी शहर पोलिस उपाधीक्षक जितेंद्र जगदाळे, शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजीवन मिरकले, रमेश भुतडा, विजय जाधव, विकास कदम, डॉ. भारत घोडके, गोडभरले यांच्यासह दामिनी पथक, चालीर पथकाचे अधिकारी, शिकवणीचालक वसतिगृह संचालक व संबंधित यंत्रणांचे प्रतिनिधी उपस्थित होते. लातूर ही शिक्षणाची ...पान ७ वर

## संपकरी अंगणवाडी सेविकांचा शहापूर ते ठाणे पायी पदयात्रा मोर्चा शुक्रवारी पोहोचणार मुख्यमंत्र्यांच्या दारी



**भिवंडी/अभिजित हिरे**

अंगणवाडी सेविकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी २० फेब्रुवारी पासून महाराष्ट्रातील तब्बल दोन लाख अंगणवाडी सेविकांनी महाराष्ट्रव्यापी बेमुदत संप सुरू केला आहे. अंगणवाडी सेविकांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघा च्या नेतृत्वाखाली शहापूर ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानापर्यंत पदयात्रा एल्गार मोर्च्याचे आयोजन करण्यात आले आहे. भर उन्हात या पदयात्रे मध्ये शेकडो अंगणवाडी सेविका महिला सहभागी झाल्या आहेत. महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाचेप पदाधिकारी ब्रिजपाल सिंग, भगवान दवणे, गुलाब वरकुटे अर्पणा पानसरे यांच्या नेतृत्वाखाली निघालेला हा पदयात्रा महिला मोर्चा गुरुवारी सकाळी भिवंडी तालुक्यात दाखल झाला. पडघा येथे दुपारच्या मुक्कामा नंतर रात्री दापोडा येथे मुक्काम करून शुक्रवारी सकाळी ठाण्यात धडकणार आहेत. या महिला रस्त्यात गाणी म्हणत घोषणा देत मार्गक्रमण करीत आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, मानधनवाढ दरमहा अर्ध्या ...पान ७ वर

## बीएनएन महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे बेमुदत संप आंदोलन



**भिवंडी** : बारावी परीक्षा सुरू होत असताना महाराष्ट्र राज्य विद्यापीठ व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती तर्फे महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी यांचे राज्यव्यापी आंदोलन सुरू केले असून भिवंडी शहरातील बीएनएन महाविद्यालयातील ६० कर्मचारी यांनी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर जोरदार घोषणाबाजी करीत आंदोलन सुरू केले आहे. सेवांतर्गत सुधारित आश्वासित प्रगती योजनेचे रद्द केलेले शासन निर्णय पुनर्जिवीत करुण पुर्ववत करणे. सातवा वेतन आयोगातील तरतुदीनुसार १०,२०,३० वर्षानंतरच्या लाभा ची योजना लागु करावी,सातव्या वेतन आयोगानुसार वंचित असलेल्या १४१० विद्यापीठीय शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना थकबाकीसह सातवा वेतन आयोग लागु करावा, विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता द्यावी,२००५ नंतर सेवेत रुजु झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागु करावी,विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी गृहित धरुन त्या आधारे सातव्या वेतन आयोगाची वेतन श्रेणी लागू करावी या प्रमुख मागण्या या बेमुदत आंदोलनाच्या माध्यमातून आंदोलांकर्त्यांच्या आहेत.

## चिन्ह नव्हे विचार महत्वाचा आहे; महाराष्ट्रात गद्दारांचा इतिहास लिहीला जात नाही

### वलांडीत शिवगर्जना अभियानात विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांचे उद्गार




**देवणी/शकील मनियार**

महाराष्ट्रात गद्दारांचा नव्हे ईमानदारांचा ईतिहास लिहीला व वाचला व चिरकाल टिकलाही जातो. शिवगर्जनेच्या माध्यमातून ऊद्धव बाळासाहेब ठाकरेंचे विचार गावपातळी पर्यत पोंहचवण्याची अभियान शिवगर्जनेच्या माध्यमातून चालू असून चिन्ह महत्वाचे नाही विचार महत्वाचा आहे. सुर्याजी पीसाळ व खंडोजी खोपडे सारख्या गद्दारांचा इतिहास महाराष्ट्रात लिहीला जात नाही ही महाराष्ट्राची परंपरा आहे, गद्दार शासनाची हकालपट्टी झाल्या शिवाय रहानार नाही असे उदगार विधानसभा विरोधीपक्ष नेते अंबादास दाणवे यांनी काढले. वलांडी ता. देवणी येथील शिवगर्जना अभियाना प्रसंगी ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर जिल्हा संपर्क प्रमुख विठ्ठल गायकवाड, महानगर संपर्क प्रमुख विश्वनाथ स्वामी, लातूर जिल्हा प्रमुख शिवाजी माने, ग्रामीणचे जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, संतोष सोमवंशी, माजी जिल्हा प्रमुख पप्पू कुलकर्णी, नामदेव चाळक हरिभाऊ सगरे, निलंगा तालूका प्रमुख अविनाश रेशमे, महीला आघाडीच्या जिल्हा संघटक डॉ.शोभा बेंजरगे जिल्हा महीला संघटीका सुनिता चाळक, शिरूर अनंतपाळ तालूका ...पान ७ वर

